# चैतन्य लहरी

अंक ११,१२

नोव्हेंबर/डिसेंबर २००२











# अनुक्रमणिका


तमसो मा ज्योतिर्गमय ........ २

नवरात्री पूजा लॉस एन्जिल्स, अमेरिका २००२ ........ ३

श्री गणेश पूजा, कबेला, २००२ ........ ७

संत कबीर परिचय ........ ११

अमृत वाणी ........ १४

आत्मपरीक्षण, शूडिकॅम्प, इंग्लंड ........ १५

अनाहत चक्र ........ १८

सहज समाचार ........ २१


सहजयोगी बंधू व भगिनींना
प.पू.श्रीमाताजींच्या कृपेने पुढील नवीन वर्ष
आनंदाचे, सुख-समृद्धीचे भरभराटीचे व चैतन्यमय जावे.
सर्वांच्याकडून जगभरात सहजयोगाचे प्रचंड कार्य घडो.


पर्क :- चैतन्य लहरी, सहजयोग केंद्र, प्लॉट नंबर ७९, सर्वे नंबर ९८, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे-४११ ०३८
टेलिफोन : ०२०-५२८ ०६६८, ५२८ ६१०५ इमेल : chaitanyalaharipune@rediffmail.com



## तमसो मा ज्योतिर्गमय

फार पूर्वीपासून आपल्या संस्कृतीमधें ही प्रार्थना केली जाते. वैदिक काळामधेंही हीच आराधना केली जात होती व आजही अनेक प्रसंगी दीपप्रज्वलन करुन कार्यक्रम सुरु करण्यामागें हीच भावना प्रकट केली जाते. तम म्हणजे अंधार; संसाररुपी भवसागरांत मानव अंधारात चाचपडल्यासारखा राहतो. हा अंधार अज्ञानमय असल्यामुळें आपणच निर्माण केलेला असतो. 'स्व'रुप न जाणल्यामुळे माणूस माया,भ्रम, भ्रांन्ति यांच्या जाळ्यांत गुरफटून जातो; खोट्या 'मी'पणामधें अडकून राहिल्यामुळें हा भवसागर पार करण्याचा मार्ग त्याला सापडेनासा होतो. अनेक थोर संतपुरुषांनी वेगवेगळ्या धर्मसूत्रांमधून 'स्व'रुप जाणण्याचा उपदेश केला पण धर्मालाही मानवगुण लागल्यामुळें हा अंधार टिकूनच राहिला.

अंधार नाहींसा होण्यासाठीं प्रकाश हवा. आपण सहजयोगी अत्यंत भाग्यवान की आपल्याला अवतरण स्वरुप प.पू.श्रीमाताजींकडून कुण्डलिनी जागृतीमधून हा अंधार दूर करणारा आत्मप्रकाश मिळाला. दिवाळीच्या दीपोत्सव नुकताच पार पडला; या दिपोत्सवाचा अर्थ श्रीमाताजींनी अनेक वेळां समजावून सांगितला आहे व त्याचे पुन:स्मरण करणें त्यानिमित्ताने अधिकच उचित आहे.

श्रीमाताजींनी कुण्डलिनी-जागृतीचा सहज-सुलभ मार्ग उपलब्ध करुन मानव जातीवर आपला आत्मा चैतन्याच्या प्रकाशांत आणण्याची महाकृपा केली आहेच पण त्याचबरोबर दुसऱ्यांची कुण्डलिनी जागृत करण्याची शक्तिही आपल्याला दिली आहे. आदिशक्तीचे अवतरणच हे महत्कार्य करुं शकते. पण त्याचबरोबर सहजयोग्यांची जबाबदारी काय आहे याचीही जाणीव त्या आपल्याला करुन देत आहेत. त्यांच्या अनेक प्रवचनांत याबद्दल पोटतिडिकेने उल्लेख केलेला वारंवार आढळून येतात.

या उपदेशाचा सार आपण आत्मसाक्षात्कारामधें परिपूर्णपणे प्रस्थापित व अग्रेसर बनले पाहिजे यांतच सामावलेला आहे.आपल्या हृदयात आलेला आत्मप्रकाश अधिकाधिक तेजस्वी व प्रखर बनून बाहेर सर्वदूर पसरला व अनेकानेकांमधें आला की सहजयोग्यांचा खरा दीपोत्सव होणार आहे व श्रीमाताजींचे स्वप्न साकार होणार आहे.

आपण सर्वजण पुन्हां पुन्हां ''तमसो मा ज्योतिर्गमय'' हीच प्रार्थना श्रीमाताजींच्या चरणीं समर्पित हृदया मधून करुं या.

●●●







# नवरात्री पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण(सारांश)
लॉस एन्जिल्स, अमेरिका
२७ आक्टोबर, २००२

भक्ती आणि श्रध्दा दृढ करुन ध्यानामधून शहाणपण मिळवले पाहिजे.

आज आपण देवीची पूजा करणार आहोत. आपण प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की देवीने डावी बाजू प्रथम शुध्द केली आणि नंतर सहस्रारात आदिशक्ती स्वरुपात ती स्थापित झाली. डाव्या बाजूने देवीने केलेले सर्व कार्य देवीमहात्म्या सारख्या ग्रंथात लिहीले गेले आहे. देवीने आपल्याला स्मृती आणि सुबुध्दी दिली. त्याचबरोबर ती गणांकडून आपले संपूर्ण संरक्षण करते.

सर्व गण आपल्याला सुधारण्यासाठी सदैव प्रयत्नशिल असतात आणि देवीच्या आज्ञेनुसार ते कार्य करीत रहातात, त्यांना देवीकडूनच त्यासाठी शक्ती पुरविली जाते. डावी बाजू पूर्णपणे संभाळण्याचे कार्य गणांकडून केले जाते. तुम्हाला माहितच आहे की, डावी बाजू बिघडली तर कॅन्सर सारखे दुर्धर आजार होऊ शकतात. असे आजार गणांकडूनच बरे होऊ शकतात. कारण गणांवर देवीचे पुर्ण नियंत्रण असते. आपल्या सहजयोगामधेही कॅन्सर बरा झालेले व डाव्या बाजूचे त्रास सुधारलेले लोक आहेत. सर्व गण श्रीगणेशांच्या आधिपत्याखाली असतात. म्हणून तुमच्यामधिल गणेशतत्व जागृत असेल तर तुम्हाला काहीही त्रास होत नाहीत. पण गणेशशक्ती क्षीण झाली की अनेक प्रकारचे त्रास होऊ शकतात.म्हणून गणेशतत्व सक्षम करण्यासाठी आपण फार काळजी घेतली पाहिजे. नुकतेच मला डाव्या बाजूचे अनेक त्रास असलेल्या लोकांचे पत्र आले. अशा लोकांनी श्रीगणेश तत्व सुधारण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे ध्यान करणे.

ध्यानासाठी सर्वप्रथम कुण्डलिनी जागृत झाली पाहिजे. त्यानंतरच सर्वप्रकारच्या सुधारणा घडू शकतात. त्यानंतरच तुम्ही गणांबरोबर संवाद राखू शकता. एरवी माणूस कसल्या ना कसल्यातरी भ्रमामधे अडकतो आणि गणेश तत्वाकडे दुलक्ष करतो. म्हणून देवीची पूजा करताना तुम्ही आपोआपच श्रीगणेशांचीही पूजा करतो,कारण श्रीगणेशांच्या मागे देवीची शक्ती आहे. देवीची सर्वात महत्वाची आणि मोठी शक्ती म्हणजे ती तुमचे संपुर्ण रक्षण आणि संरक्षण करते. डाव्या बाजूलाही देवीचे पूर्ण संरक्षण मिळते. या संरक्षण कार्यामधे देवीच तुम्हाला सर्व मदत करते, मार्गदर्शन करते आणि आधार देते. हे सर्व कार्य देवी गणांकडून करुन घेते. माणूस जेव्हा उजव्या बाजूला झुकतो तेव्हा देवीच त्याला मदत करुन ठिक करते. तुमच्यामधे नम्रता निर्माण करते आणि तुम्ही तिची लेकरे आहात हा समजूतदारपणा तुम्हाला देते. हे प्रत्येकाने लक्षात ठेवणे जरुरीचे आहे. माणूस जेव्हा कुठल्या एका प्रकारच्या टोकाला जातो तेव्हाच त्याला उजव्या वा डाव्या बाजूचे त्रास होऊ लागतात.

आजकालच्या जीवनामधे उजव्या बाजूचे प्रश्न अधिक अधिक गंभीर होत चालले आहेत आणि त्यातुनच 'अल्जायमर' सारखे रोग होत आहेत. या सर्वांचे मूळ कारण म्हणजे लिव्हर खराब होणे. लिव्हरमुळेच अनेक प्रकारचे रोग पैदा होतात. अतिविचार करणारे लोक, भविष्याबद्दलचा अतिशय त्रास करुन घेणारे, आक्रमक व अहंकारी स्वभाव ही सर्व लिव्हर खराब झाल्याची लक्षणे असतात. लिव्हरची शक्ती संपुष्टात आली की मग तुमचे त्रास, आजार बरे करणे अशक्य होऊन जाते. अर्थात सहजयोगातून लिव्हर ठिक झाल्याची अनेक उदाहरणे आपल्याकडे आहेत. म्हणून नम्रपणा बाळगून सर्वांनी लिव्हरची काळजी घेतली पाहिजे. ह्या सर्व त्रासांपासून डाव्याबाजूसाठी गणांकडून संरक्षण मिळते



आणि उजव्या बाजूच्या प्रतिक्रीयांपासून तुम्हाला संरक्षण मिळते. या सर्वांमधेच देवीचे महात्म्य आहे. अर्थात देवीच आपले संरक्षण करेल, मार्गदर्शन करेल, काळजी घेईल हे गृहीत धरुन राहू नये.

म्हणूनच नियमित ध्यान करणे फार फार महत्वाचे आहे. ध्यानाशिवाय तुम्ही काहीही मिळवू शकत नाही. ध्यानाला कसलाही पर्याय नाही. ध्यानामधूनच तुम्ही देवीच्या चैतन्य शक्तीच्या संपर्कात येता. सर्वसाधारण पशु-पक्षीसुध्दा सहजपणे देवीच्या कृपेत असतात. पण माणसाला बुध्दी आणि बौध्दिक स्वातंत्र असल्यामुळे ते कुठे ना कुठे तरी भरकटतात आणि आडचणीत सापडतात. विषेशत: अमेरिकन लोकांनी या बद्दल काळजी घेणे आवश्यक आहे आणि त्यासाठी त्यांच्यामधे भक्ती आणि समर्पण वाढले पाहिजे. भारतीय संस्कृतीमधे भक्ती सर्व साधारणपणे असतेच, म्हणून ते अहंकारासारख्या दोषांकडे फार वळत नाहीत. भक्ती कशी ऱ्हदयात निर्माण करावयाची हे सांगणे कठिण आहे. पण भारतामधे केवळ अनन्य भक्तीमधून खुप उन्नत झालेले अनेक महान साधू-संत होऊन गेले आहेत. म्हणून भारतीय लोकांमधे भक्ती भावना मुळातच असते. इथल्या लोकांसारखा विचित्र पंथ पाळण्याचे प्रकार तिकडे दिसत नाहित. भक्ती आणि श्रध्दा बळकट झाल्याशिवाय उन्नति साधणे शक्य नाही आणि तुमचे अहंकारासारखे विचीत्र दोष दुर होणे शक्य नाही. भक्तीची कुणावर सक्ती करता येत नाही कारण ती ऱ्हदयातच निर्माण होत असते. त्यासाठीच तुमच्यामधिल सर्व सद्‌:गुण, तुमच्या बुध्दीमधिल शुध्दता व्यवस्थित राहिली पाहिजे. त्यातुनच भक्तीचा खरा अनुभव आपल्याला अनुभवायला येतो. अशी भक्ती जेव्हा प्रकट होऊ लागते तेव्हा देवी तुमच्या बुध्दीमधून कार्य करु लागते. असे उन्नत झालेले अनेक संत भारतात होऊन गेले, त्यांची चरित्रे जरी तुम्ही वाचली तरी तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. भक्ती म्हणजे ग्रंथ पारायण किंवा कोरडा जप - जाप आणि मंत्र पठण नव्हे. पण ती ऱ्हदयात अगदी खोलवर रुजली पाहिजे. आत्मा जेव्हा प्रकाशित होतो तेव्हा अशी भक्ती निर्माण होते आणि तुमच्यामधिल सर्व दुर्गुण, चुकीच्या धारणा, वेडगळ समजूती गळून जातात. या सर्व दैवी गुणांचे वर्णन देवीच्या पवित्र ग्रंथात केलेले आहे. अशा भक्तीमधून तुमच्यामधे आपोआपच शुध्दबुध्दी(Wisdom) निर्माण होते आणि तुम्ही एक शुध्द व्यक्तिमत्व बनता. हे दैवी शहाणपण हा देवीचा फार मोठा आशिर्वाद असतो. भक्तिमधून हेच मिळवायचे असते. सहजयोगामधून भक्तीचे खरे स्वरुप कळते आणि तुम्ही खऱ्या अर्थाने भक्ती जाणता आणि करता. याच्यामधे कसल्याही प्रकारची अंध श्रध्दा नसते. अंध श्रध्दा असेल तर तुम्ही कसल्यातरी वेडगळ प्रकारच्या मार्गाकडे जाता.

कुण्डलिनी जागृतीमधूनच आपल्याला भक्तीचा खरा अर्थ समजतो आणि आपण खऱ्या अर्थाने भक्ती करतो. अशा भक्तीमधूनच सर्व प्रकारचे संरक्षण करण्याची शक्ती माणसाला मिळते. तुम्ही स्वत:ला आणि आजूबाजूच्या परिस्थितीला नीट समजू शकता. भारतामधे अनेक थोर भक्तांनी असे कार्य खूप केले आहे आणि त्यामुळे माझ्या कार्याला मदतच झाली आहे. आजकाल भारतामधेही काही मुर्खपणाचे व खुळचटपणाचे प्रकार घुसले आहेत. त्याचे कारण शहाणपणाचा संपूर्ण अभाव.

म्हणून भक्तीमधूनच मिळविण्याची मुख्य गोष्ट म्हणजे तुमच्यामधे सूज्ञता, समजूतदारपणा व शहाणपणच रुजला पाहिजे. त्यातुनच तुमची आकलन शक्ती प्रभावी होईल. आपण जे काय करतो ते शहाणपणाचे द्योतक आहे का. हे सतत तपासत राहिले पाहिजे. तसे नसल्यामुळे सहजयोगातही काही चमत्कारीक लोक आढळतात. पाश्चात्य संस्कृतीमधे भक्ती आणि श्रध्दा खूप मोठया प्रमाणावर अजून रुजली पाहिजे. भक्ती आणि श्रध्दा आपल्यामधे देवीच निर्माण करीत असते आणि ते आपण ध्यानामधूनच प्राप्त करुन घेऊ शकतो. त्याबाबतीत अनेक चमत्कार घडत असल्याचे तुम्ही अनुभवले आहे. त्याचबरोबर देवी तुम्हाला सर्वबाबतीत मार्गदर्शन करीत असते आणि तुम्हाला चुकीच्या मार्गावरुन परावर्तीत करीत राहते. डाव्या - उजव्या बाजूकडे न झुकता तुम्हाला मध्य मार्गावर ठेवण्यासाठी तीच कार्य करीत असते. तुम्ही जेव्हा स्वत:बद्दल चुकीची समजूत करुन घेता किंवा निव्वळ बुध्दीमधून विचार करता तेव्हा ते चुकीचे असल्याचे तुमच्या लक्षात येते. म्हणून समर्पणाला सर्वात जास्त महत्व आहे. ''इस्लाम'' चा अर्थ ही समर्पण हाच आहे, पण ते सांगतानाही मोहंम्मद साहेबांनी आधी आत्मसाक्षात्कार झाला पाहिजे हे सांगितले आहे.

कुण्डलिनी जागृत झाल्यावरही आत्मसाक्षात्कारामधे प्रस्थापित होण्यास कधी कधी वेळ लागतो. पण एकदा का तुम्ही आत्मसाक्षात्कारामधे योग्य प्रकारे प्रस्थापित झालात की तुम्हाला देवीचे कार्य कसे चालते ते बरोबर समजते. काही लोक सहजयोगात येतात, माझा आदर करतात, पण मला नीट न समजून घेतल्यामुळे त्यांनाही त्रास होतात. त्याचे कारण देवी शक्तीबरोबर पूर्णपणे जोडले गेले नसतात. देवी शक्ती बरोबर जेव्हा तुम्ही संपूर्णपणे जोडले जाता तेव्हा तुमच्यामधून केवळ प्रेम आणि करुणा वाहू लागते आणि सर्व काही योग्यवेळी सुरळीतपणे घडून येते. म्हणून तुम्ही सदैव देवीकडे संरक्षणासाठी प्रार्थना करीत राहिले पाहिजे आणि त्यातूनच तुम्हाला शारिरीक, मानसिक, आध्यात्मिक अशा सर्व तऱ्हेचे संरक्षण मिळते. सहजयोग्यांना ही स्थिती



मिळवीणे सहज शक्य आहे या सर्वांच्या मुळाशी तुमच्या मधे जागृत झालेली सुबुध्दी असते. सुबुध्दी नसल्यामुळे मानवासमोर अनेक समस्या उभ्या रहातात. कोणी पैशाच्या मागे लागतो, कोणी अधिकार व सत्ता मिळविण्याच्या मागे लागतो, तर कोणी धर्माच्या आणि देवाच्या नावावर चुकीच्या गोष्टी करतो. सर्व धर्माचे मुळ सुत्र मानवाच्या हिताचे असले तरी त्याच्या आचरणामधे सुबुध्दिचा अभाव असला की धर्माच्या आणि देवाच्या नावावर लोक कलह तंटे वगैरे विध्वंस याच्या मागे लागतात आणि सर्व मानवसमाजाला हानी पोहचवतात.

सुबुध्दी मानसाला योग्य तेच मार्गदर्शन करते. चुकीचे काय आणि बरोबर काय हे त्याला आपोआप समजते. सुबुध्दीचे तेच मुख्य कार्य आहे. ज्याच्या व्यक्तिमत्वामधून ही सुबुध्दी प्रगट होते तो एक फार उच्च स्थितीवर पोहचलेला सहजयोगी असतो. सुबुध्दी देणारी देवता ही श्रीगणेशच आहे. म्हणून गणेश तत्त्व व्यवस्थित सांभाळले पाहिजे. सुबुध्दी तशी माणसात मुळातच असते. पण गणेशतत्व ठिक राहिल्यामुळे ती व्यक्त होऊ लागते भक्ती मधून ही सुबुध्दी जोपासण्याचा प्रत्येकाने आवर्जून प्रयत्न केला पाहिजे. त्यानंतर आपोआपच अशी व्यक्ती पैसा,सत्ता अशा कसल्याच गोष्टींचा विचार करीत नाही तर आपल्यामधिल शहाणपण व समजुतदारपणा वापरत रहातो.परमेश्वराच्या इच्छेनुसारच त्याचे कार्य होत रहाते. तोच खरा शहाणा आणि परमेश्वरी कार्याचा तो एक प्रभावी माध्यम बनतो. असा मनुष्य सदैव नम्र असतो, शांत असतो, रागाने किंवा चिडून बोलत नाही.

प्रत्येक माणसाला ही सुबुध्दी मिळविणे शक्य आहे. पशु-पक्षांमधेही ही सुबुध्दी उपजत असते, पण त्यांना त्याची जाणिव नसते. माणसामधे सुबुध्दी आली की तो सदैव जागरुक असतो. ही सुबुध्दी केवळ ध्यानामधूनच प्राप्त होऊ शकते. त्यासाठी भक्तीचा खरा अर्थही समजून घेतला पाहिजे. भक्ती वरकरणी असून काही होणार नाही. हे शहाणपण साध्या सुध्या नोकर चाकरामधूनही आपणास दिसून येते. खऱ्या अर्थाने सहजयोगी होण्यासाठी ही सुबुध्दी आणि शहाणपण आवश्यक आहे. अशी व्यक्ती कधीच कुठलीही चुकीची गोष्ट करणार नाही. हे सुध्दा देवीच्या आशिर्वादामधूनच घडत असते. अशीच माणसे संत पुरुष म्हणवण्यास योग्य असतात. अमेरिकेतही असे शाहणपण नसलेली अनेक माणसे वाटेल ते प्रकार काही काळ करीत होती. पण त्यांचा आपोआपच अंत झाला. कारण ते फक्त पैसा आणि सत्तेच्या मागे लागणारे लोक होते. त्यांच्यामधे खरे संतत्व नव्हते.प्रत्येक सहजयोगी संत बनू शकतो. पण शहाणपण जर जोपासला नाही तर त्याचा सहजयोगाला काही फायदा नाही. एक उदाहरण सांगण्यासारखे आहे. ''एक सहजयोग्याला गाडीतून जात असताना अचानक दुसऱ्या रस्त्याला जाण्याची इच्छा झाली. आणि नंतर समजले की आधीच्या रस्त्यावर मोठा अपघात झाला होता'' अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. याच्या मुळाशीपण परमचैतन्याला त्यांची आवश्यकता असल्यामुळे अशा प्रकारच्या लोकांचे संरक्षण केले जाते. ज्याच्या जवळ अशी प्रगल्भ सुबुध्दी असते तोच परमचैतन्याच्या कार्याचे उत्कृष्ठ माध्यम बनु शकतो. पुर्वीच्या काळी देवीने अनेक राक्षसांचा संहार केला, पण आताच्या काळी देवीच्या कार्याला अशा माध्यमाची जरुरी आहे. मी प्रथम अमेरिकेला आले तेव्हा येथे अनेक अगुरुंचे अनिष्ठ प्रकार चालू होते. म्हणून मी नऊ वर्षे परत अमेरिकेला आले नाही. त्याकाळात असे अनेक अगुरु झाले आणि लोक वेड्यासारखे त्यांच्या मागे लागेल होते.पण आता परिस्थिती सुधारत आहे. लोकांच्यात सुबुध्दी हळू-हळू जागृत होत आहे. म्हणूनच तुम्ही जास्तीत जास्त लोकांना सहजयोग सांगत चला आणि त्यांच्या मुळ आत्मस्वरुपाची त्यांना जाणिव करुन देत चला. म्हणजे त्यांना चर्च, मंदिर इत्यादी प्रकारे काही मिळण्यासारखे नाही हे समजेल. एकदा आत्मतत्व जागृत झाले की लोक सरळमार्गावर

ज्यो भारत भरुही के अंडा राखे गज के घंट तरी ।

सूरदास ताहि डर काकौ, निसिबासर जो जपत हरी ॥

तुला तर ठाऊक आहेच की, हत्तीच्या गळ्यात घंटेच्या आत माझ्या भक्त पक्षांची अंडी मी नष्ट होऊ न देता, सुरक्षित ठेवली. सूरदास सर्व भक्तांना आश्वासन देतो की, जे अहोरात्र हरीचा जप करतात, त्यांना या जगात कसलंच भय राहत नाही.

(ज्याचे चित्त अहोरात्र सहस्रावर आहे त्यांना कसलेच भय राहत नाही.)



येतील. त्यासाठीच प्रत्येक सहजयोग्याने श्रध्दा आणि भक्ती वाढवून स्वत:च्या उन्नतीचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे. भक्ती आणि श्रध्दा अत्यंत सुंदर पोषक आणि आनंददायी प्रवृत्ती आहे. त्यासाठीच आपल्यामधिल सुबुध्दी आणि शहाणपण (Wisdom) जोपासले पाहिजे. देवीची श्रध्दापुर्वक भक्ती केल्यानेच शहाणपण तुमच्यामधे जागृत होईल.

शहाणपण ही एक फार मोठी शक्ती आहे. आणि त्याच्यामागे देवीचीच कृपा आहे. मानवामध्ये ही सुबुध्दी वाढणे हा उन्नतिप्रक्रियेचा भाग आहे. देवीच्या कृपेने आजपर्यंत मानवाने जी उन्नति मिळविली त्याच्या पुढिल प्रगतिसाठी श्रध्दा, भक्ती आणि सुबुध्दी फार आवश्यक आहे. म्हणूनच खिस्तांनी "Behold The Mother" असा उपदेश केलेला होता.पण माणसाच्या अजूनही चुकीच्या वृत्ती बदलत नाहित आणि त्याला खरे सत्य समजल्या शिवाय उन्नतिचा वेग येणार नाही.

म्हणून तुम्ही सहजयोगाचे कार्य करतानाही मला सांगावेसे वाटते की, तुमच्यामधे हे दैवी शहाणपण आहे अथवा नाही हे तपासत रहा, त्यानुसार स्वत:ला घडवा.म्हणजे तुम्हाला देवीचे आशिर्वाद प्राप्त होतील. त्यासाठीच अधिक अधिक ध्यानात रहाणे आणि अधिक अधिक चैतन्य लहरींच्या संपर्कात रहाणे आवश्यक आहे. म्हणजे तुम्हाला स्वत;ची स्थिती आणि चैतन्यलहरींची जाणिव जास्त स्पष्टपणे जाणवेल.मग तुमच्या लक्षात येईल की इतर कोणतीही भौतिक संपत्ती मिळविण्यापेक्षा अशी श्रध्दा, भक्ती आणि शहाणपण मिळविणे याच्या सारखी दुसरी गोष्ट नाही. त्यातुनच तुम्हाला आनंदाचा खरा अनुभव येईल. आताचा समय परमेश्वरी कार्य घडून येण्याचाच आहे. म्हणूनच मी आता तुमच्या देशाकडे जास्त चित्त लावून आहे. पण तुम्हीच श्रध्दा, भक्ती आणि सुबुध्दी मिळवून तुम्ही मला मदत करणार आहात. कधी कधी सहजयोग्यांचेही याच्याकडे दुर्लक्ष होते. खरेतर सहजयोग नीट समजण्यासाठीही अगोदर शहाणपण(Wisdom)पाहिजे. नुसते स्वत:ला सहजयोग करतो असे म्हणून काही मिळत नाही तर तुमच्यामधून सहजयोग व्यक्त झाला पाहिजे. तुमच्यामधिल संतुलन, शांती आणि प्रेम व्यक्त झाले पाहिजे आणि सर्वत्र पसरले पाहिजे.

अमेरिकेमधे याची आजकाल फार जरुरी आहे. कारण येथे अहंकार, सत्ता व पैसा याच्यामागे लागण्याच्या प्रवृत्ती फार बळावत आहेत. पण त्यांच्या चुका आता त्यांच्या लक्षात येऊ लागल्या आहेत. आता त्यांनी स्वत:ला नीट ओळखण्याची वेळ आली आहे. आता अमेरिकेत सहजयोग खुप पसरला आहे आणि सहजयोग्यांची स्थितीपण सुधारत आहे. म्हणून त्यांनी त्यांची शक्ती परमेश्वरी कार्याकडे अधिक लावणे श्रेयस्कर आहे.

- सर्वांना अनेक आशिर्वाद









# श्री गणेश पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण(सारांश)
कबेला, १४ सप्टेंबर २००२

आत्मा म्हणजे शुध्द आनंद. हा आनंद तुमच्यामधून प्रवाहित होण्यासाठी श्रीगणेशांचे आशीर्वाद मिळविले पाहिजेत.

आज आपण श्री गणेश पूजनासाठी येथे जमलो आहोत. श्रीगणेश हे अबोधितेचे (Inocence)दैवत आहेत.लहान मुलात जन्मत:च अबोधितता असते. श्रीगणेश शक्ती एवढी तिक्ष्ण असते की, कुठल्याही परिस्थितीत मुलांचे रक्षण करते. त्यामुळेच ती प्रिय वाटतात. त्यांच्या निरागसतेची आपण मजा घेतो.

जेव्हा आपली वाढ होत असते त्यावेळी आपले सहस्रार बंद होत जाते आणि बऱ्याच विक्षिप्त गोष्टी आपल्या आत ओढल्या जातात आणि त्या आतच राहतात. आपल्या चारित्र्यावर व नैतिकतेवर अबोधिततेचा मोठा परिणाम होतो. ज्यावेळी तुम्ही निरागस असता त्यावेळी तुम्हाला नैतिकता, अनैतिकता किंवा धूर्तता याचा गंध नसतो. कारण श्री गणेश तुमची काळजी घेतात. त्या स्थितीत कुणीही तुम्हाला इजा करु शकत नाही.जे लोक अबोधितेत असतात ते मोहमाया इ. भौतिक गोष्टीपासून दूर राहतात. त्यांच्या पवित्रतेला कोणी बिघडू शकणार नाही. ही अबोधितता जी आपल्याला प्राप्त झाली ती बरीच पूर्वी (प्रथम)स्थापित केली गेली, हा एक मोठा आशिर्वाद आहे. आपली 'अबोधितता' हा एक मोठा गुण आहे.

'आनंद' हा श्री गणेशांचा विशेष गुण आहे. जसे नुसते लहान बालकाला पाहून आपल्याला आनंद होतो. अजूनही काही सहजयोगी मी पाहते, ते या आनंदापासून दूर आहेत. ते कधी हसत नाही, नेहमी गंभीर असतात. कुठल्याही गोष्टीत त्यांना आनंद वाटत नाही, हे त्यांच्यातील अबोधितता नष्ट झाल्याचे लक्षण आहे. लहान मुलासारखे सहजयोग्यांनीही दुसऱ्याला आनंद दिला पाहिजे. अगदी जसा नवजात बालकात असतो. ज्यांना असा आनंद उपभोगण्याची वृत्ती नाही अशांना कोण मदत करणार? अगदी श्रीगणेशही करणार नाहीत. हा जन्मजात गुण तुमच्यात नसेल तर इतर कुठल्याही गोष्टीत अर्थ राहत नाही, जसे कोणाला अमके जेवण आवडते, कोणाला अमका रंग अवडतो इ. तर गणेशतत्त्वाशिवाय शुध्द आनंद तुम्ही घेऊ शकणार नाही. नाहीतर एखाद्या वस्तूकडे पहाल तर त्यातील शुध्द आनंद घेण्या ऐवजी आपलीच बुध्दी चाळवत बसता. उगीच शंका करता, स्पष्टीकरण करण्यात गुंतता. जगात असे अनेक समीक्षक, शंकाकार आहेत, जे गणेशतत्त्वहीन असतात.ते एकमेकावर सतत टीका करत रहातात.ज्याला अंत नसतो, असले लोक एक स्वत:चीच जमात निर्माण करतात.जसा अंगावर एखादा ठणका करणारा फोड यावा, असे ते घातक व अपायकारक ठरतात.

सर्व गोष्टीत, सर्व मुलात व दुसऱ्यांच्या वागण्यातुनही आपल्याला आनंद मिळाला पाहिजे. हा श्री गणेशांचाच आशिर्वाद आहे. कुण्डलिनीचे रक्षण करणे, तिला मार्गदर्शन करणे व सर्व चक्रावर शक्ती देणे, ही गणेशशक्तीची सुंदरता आहे. श्री गणेशांच्या आशिर्वादा शिवाय सहजयोगी कुचकामी ठरतात. तुम्हांला वाटते गंभीर राहून तुमची उन्नति झाली आहे, परिपक्व झाला असे उगीचच वाटते. उलट तुम्ही दुसऱ्याचे दोष शोधता, दुसऱ्यांना ताप देणारे होता, मग सर्वांना नावडते होता. असा तुमचा स्वभाव होतो कारण त्यात श्री गणेशांच्या अबोधिततेचा अभाव असतो. तुम्हापासून, दुसऱ्याला आनंद देणे ही श्री गणेशांचा गुण तुमच्याकडे हवा. ते दुसऱ्यांना किती देता यावर तो अवलंबून आहे. यासाठी मला हे द्या, मला अमके पद द्या, वगैरे वगैरे असे तो कधीच मागत नाही. स्वत:च्या



दयाळूपणाने विनोदी स्वभावातून तो दुसऱ्यांना आनंदच देत असतो. तो कधीही कोणाचा आपमान करणार नाही, दुखावणार नाही. चुकून तसे झालेच तर हजारवेळा तुमची क्षमा मागेल, अशी आनंदी व्यक्ती खरी सहजयोगी म्हणावी. असे खूप सहजयोगी दिसायला हवे. दुसऱ्यांचे दोष न पाहता दुसऱ्यांचा हेवा न करता त्यांच्यातील चांगले गुण, वैशिष्ठे ते पहातात. ते गोरा कां काळा, उच्च की नीच हे सुध्दा त्यांच्या मनात येत नाही. हाच खरा शुध्द आनंद (Absolute) आहे.

सध्याच्या या प्रगत युगात लोकात एकमेकांची उणेदुणी काढण्याचे प्रमाण फार वाढले असे वाटते. मी अमक्या कुटुंबातला, अमक्या देशांतील असा वेगळेपणा दाखविण्याची वृत्ति दिसून येते. त्यामुळे मोठी समस्या ते निर्माण करतात. हा एक मोठा दुर्गुण आहे. आता मी या धर्माचा त्या धर्माचा या वृत्तीमुळे फार कठीण समस्या निर्माण झालेल्या आहेत. लोक एकमेकांपासून दूर जाऊ लागलेत. कांही लोक आपल्या देशाचा उदो उदो करतात व आम्ही कुठेच चूकत नाही असे सांगतात. आम्हीच खरे. आता जे या सर्व खुळचट गोष्टीकडे पाहून त्यांना याचे हसू येते. त्यातील विनोद पाहून ते हसतात, ज्यात कुठेच सत्य दिसून येत नाही. आनंदाच्या कक्षेतच तुम्हाला सत्य सापडेल. असे नसेल तर वरील गोष्टीत तुम्ही दोष पहाल, निराश व्हाल, त्रस्त व्हाल.

जे लोक स्वत:लाच खरे समजतात व इतर सगळे चूक आहेत अशा लोकांना आपण मार्गावर आणले पाहिजे. त्यांना चुकीच्या मार्गावरुन जाण्यास प्रवृत्त केले पाहिजे. या गोष्टीमुळे लोक आपल्या आनंदाला मुकतात. प्रत्येक घटनेत, ती एक आनंदाचा स्त्रोत आहे का हे जाणले पाहिजे. काही जर विकृत वाटले तर त्याकडे विनोद बुध्दीने पहावे व जे सुंदर वाटते त्याची वाहवा करावी. याबाबतीत माझे वडील मोठया खुबीने गंमत बघत. एकदा एका गायकाची माझ्या भावाने स्तुति केली. त्याबाबत माझ्या वडिलांना मी त्यांचे मत विचारले. तर ते उत्तरले, तो आपला स्वत:च्याच मजेत गात होता. लोक जरी नाराज होते किंवा त्याला हसत होते तरी ते दुलर्क्षून तो आपला गातच होता, त्याची धडाडी पहा. तर जाणण्यातील ही सुंदरता, लोकांतील दोषांची मजा घेण्याची, ही चांगली वृत्ती आहे. त्यामुळे जे मुळातच चांगले आहे त्याचा तुम्ही आनंद घ्या.

यामुळे अनेक पंथ निर्माण झालेत. उदा कॅथलिक्स व प्रॉटेस्टंट. ते एकमेकांची हेटाळणी करत असतात. यातून काय साध्य होणार? कोण प्रॉटेस्टंट म्हणवतो, कोण कॅथलिक म्हणवतो यात टेहळणी करण्यासारखे काय आहे ? आपणच यात स्वत:ची चूक काय आहे हे पहा. असे विचार कां येतात, दुसरा चूक आहे असे कां दिसते? यातून गट निर्माण होतात. भांडण करतात, तेवढेच मोठे झगडे यातून निर्माण होतात देशांच्या बाबतीतही असेच घडते. उदा. सहजयोगातही एखाद्या देशाचा प्रमुख आपल्या देशाचाच प्रतिनिधी समोर उभा करील. सहजयोग ही वेगळेपणाची ओळख आहे हे सुध्दा ते विसरतात व मी पण मग गंमत करते. मी एका गटातल्या, या लोकांतला, या धर्मातला, धर्म नाही पण या देशाचा, अशी वेगळेपणाची वृत्ती दाखवून त्याला उचलून धरणे योग्य नाही. आपण सर्व वैश्विक कुटुंबातील आहोत आहे हे पहा. आपल्याच लोकांना पुढे करणे हे थांबवा. हे सर्व पाहून तुम्हांला सहजयोगाचे मर्मच समजले नाही त्यामुळे मला दु:ख होते.

सहजयोग हा वैश्विक आहे. (Global) ही सूक्ष्मता फार आनंदायी आहे. सर्व विश्व हे एक म्हणून इश्वराने निर्माण केले आहे. तर हे देशकारण त्यात लोक एवढे गर्क होतात त्याची वाहवा करतात त्यात एवढे ते स्वत:चाच ऱ्हास ओढावतात. हे त्यांच्या लक्षात येत नाही, हे सर्व पाहून, अगदी हे देशकारण सहजयोगातही पाहून खूप हसू येते. तर ह्या सर्व देशातील लोकांना आपण ठीक केले पाहिजे. त्यांचे दोष दूर करायला हवेत.

मी काही खरे सहजयोगी पाहिले आहेत. ते आपल्या देशात काय बिघडले, कुठला त्रास आहे, लोक कसे आहेत हे सर्व सांगतात, हे आश्चर्यकारक आहे. काही लोक स्वत:बद्दल खोटा समज निर्माण करतात व सूक्ष्मपणे ते सहजयोगा विरुध्द कसे असतात हे ऐकून नवलच वाटते. ते म्हणतात, हे लोक वैश्विक नाहीत. एकदा तुम्ही वैश्विक जाणिवेत आलात की संकुचितपणाच्या सर्व समस्या नष्ट होतात. आपण आता वैश्विक आहोत आणि या देशकारणापासून दूर राहिले पाहिजे हे त्यांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे तुमचे वैश्विक व्यक्तिमत्व लोप पावते. हे वैश्विक व्यक्तीत्व श्रीगणेशच देतात, ते सर्व विश्वाचे आहेत असे लोक भले भारतात अगर इटलीत वा इग्लंडमधे असोत त्यांचे व्यक्तीत्व म्हणजे फक्त 'अबोधितता' पूर्ण अबोधितता आणि ते सर्वांना आनंददायी असतात, अशाच लोकांना मान्यता मिळते. जग मानत नाही असे होत नाही. असे लोक जे लिहीतात, जे ठरवतात ते सर्व वैश्विक, व्यापक असते. स्वत:च्या वंशाचे लोक स्वत:च्या देशातले असले तरी त्यांच्या दोषावर टीका करतील. लोकांनी गुलामी पत्करु नये. असे लोक ज्या देशाची गुलामी पत्करतात त्याची स्तुति गात असतात. स्वत:च्या आत्म्याद्वारे स्वत:ची ओळख दाखवावी. जो आपल्या आत्म्याचा



आनंद असतो तो बाहेर दिसायला पाहिजे. हेच तुमच्यातील गणेशशक्तीचे प्रकटीकरण आहे. स्वत:विषयीच्या अशा वैगुण्याबाबत लीडर्सनी जाणीव ठेवावी. आपल्यातील तसेच दुसऱ्यातील पावित्र्याचा आनंद घ्या. श्रीगणेशाचा हा महान आशिर्वाद आहे की त्यातून तुमच्या शुध्दतेचा तुम्हांला आनंद मिळतो.

सध्याच्या अधुनिक युगात पावित्र्याचा अभाव असून कुणी त्याबद्दल बोलले तर त्याला लोक वेडयात काढतात. फॅशनचा (Fashion)प्रकार एवढा वाढला की एकाने दुसऱ्याचे अनुकरण करावे. विशेषत: स्त्रिया, त्यांच्या विचित्र पोषाखामुळे त्या आपल्या पवित्रतेला मुकतात. पण लहान मुले तशी नसतात. ते अशा खुळ्या गोष्टीत स्वत:च्याच आढयात वागत नाहित. त्याबाबत ते जागृत असतात. श्री गणेश शक्ती आपल्या दृष्टीतही आहे व तसे आपण दुसऱ्याकडे पाहिले पाहिजे. भिरभिरत्या दृष्टीचे लोक मी पहाते, त्यांनी आपल्या डोळ्यावरील तावा सोडला आहे. श्रीगणेश शक्तीच्या लोपामुळे हे घडते.दूषित दृष्टीमुळें तुम्ही सूक्ष्मतेकडे पोहोचू शकत नाही. कुठल्याही गोष्टीवर एकाग्र होऊ शकत नाही.

म्हणजेच श्रीगणेशच आपल्यातील दोष दर्शवितात. उदा. लोकांच हावरेपणा. एखाद्याचा ड्रेस आवडला तर तो त्यांना हवासा वाटतो, सुंदर घर पाहिले तर ते हवे असे वाटते. पण त्या घराची सुंदरता ते पहात नाही. त्यांना सर्व हवे हवेसे वाटते पण सौदर्यदृष्टी नसते. हे सर्व गैर आहे श्री गणेशांच्या दृष्टीतून आपण विचार केला पाहिजे ते कसे वागतील? कसे निरखावे ? कसे घडवावे ? कसे विचार ठेवावे ? हे आपण लहान मुलांकडून शिकू शकतो. एक मुलगा म्हणाला, मला चंद्र खूप आवडतो का तर तो सारखा धावत असतो आणि तो ढगाआड का लपतो तर तो चालून चालून थकतो. त्याला विश्रांतीची जरुरी असते. पहा ही लहान मुलांची दृष्टी. मुलांना काय योग्य काय अयोग्य याची जाण पाहून अचंबा वाटेल. कसे वागावे, कसे एखाद्या गोष्टीला समजून घ्यावे हे त्यांना समजते. त्यांना ते शिकविण्याची जरुर नाही. कारण देवता त्यांची काळजी घेतात. उंचावरुन पडून सुध्दा मुले वाचतात, त्यांना साप किंवा इतर कोणी चावू शकणार नाही. असे म्हणतात वाघ कधी लहान मुलांचा बळी घेत नाही. मुलांची अशी सुरक्षित वाढ कशी? कुठली ही शक्ती? हे विश्व निर्माण करण्याआधी देवीने श्री गणेशांना निर्माण केले. तुमच्यातही ही श्री गणेश शक्ती प्रस्थापित करा.मग तुमचे जीवन उज्वल होते. समाज सुरक्षित असतो, मैत्रीही सुस्थितीत रहाते. मग तेथे कुटीलता हावरेपणाला जागा नसते. स्त्रियांविषयी, द्रव्याविषयी हव्यास याबाबत दूषित दृष्टीमुळे श्रीगणेश लुप्त होतात. त्यांना फक्त सर्व गोष्टीतून आनंद मिळवायचा असतो, हेच ठाऊक असते. कुठल्याही गोष्टीतून भले ती कोणाकडे असो त्यातील सौदर्याचा स्वाद घेणे तुम्हाला जमले पाहिजे, हाच तुमच्यातला आनंद आहे. तुम्ही कधीच वृध्द होणार नाही कारण तुम्ही सतत आनंदात असता. आपल्या आत्म्यावरील पकड ढिली पडली तर तुम्ही आनंदाला मुकता. आत्मा म्हणजे शुध्द आनंद. हा आनंद तुमच्या आत्म्यातून प्रवाहित होणे हेच तुमचे आनंदी व्यक्तिमत्व. अशी व्यक्ती खूप मजेदार, दुसऱ्याला आनंद देणारी असते. कुणालाही दुखावणार नाही. त्यांना छोट्या छोट्या गोष्टीत सौदर्य दिसते. निसर्गात जे निर्माण केले गेले ते सर्व अतिशय सुंदर आहे. यामुळे यावर अनेक जण काव्य करु शकतात, पण संख्या कमी आहे.कारण ते प्रेम कहाण्या व इतर क्षुद्र गोष्टींवरच काव्य करतात, ज्यात नैराश्य दिसते. साक्षात्कारी व्यक्ती अशी असू शकत नाही. अशा लोकांनी स्वत:चेच निरिक्षण करावे.

कुठल्याही व्यक्तीकडे पाहून तुम्हाला जेवढाआनंद मिळणार नाही तेवढा लहन मुलांकडे पाहताना येतो. ते जे बोलतात ते ऐकून मजा येते, हसू येते. कारण ते ऱ्हदयातून निरागस असतात.मुलांना काय योग्य सांगावे ते महत्वाचे आहे. अमके करु नका असे म्हटले तर ते मुद्दामच काहीतरी विक्षिप्त करतील.तसे सुरवातीला ते आज्ञाधारक असतात. दुसऱ्याचे ऐकले पाहिजे हे समजतात, हा त्यांचा भोळा भाव आहे. त्यांना सर्व गोष्टी एकदम सांगू नये. त्यांच्या कलाने घ्यावे. त्यांचा भोळा भाव समजून वागले पाहिजे. शुध्दतेच्या वातावरणात मुलेही शुध्द रहातात. त्यांची किंमत त्यांना समजली पाहिजे. म्हणून मी नेहमी सांगते मुलांना आपल्या (सहजयोगाच्या)शाळेत ठेवा. पाश्चिमात्यांच्या समाजात मुलांच्या निरागसतेल इजा पोहचते.अशी मुले उदास होतात, आपल्या जवळचे दुसऱ्याला देतील, दुसऱ्याला काय आवडते ते स्वत: होऊन देतील, काय दुसऱ्याला आवडते ते देण्यासाठी जपून ठेवतील.

या मुलांच्या वागणुकीतून, त्यांच्या हासण्यातून त्यांच्या आनंदापासून आपण बोध घेऊ शकतो, कारण त्यांच्यातून श्री गणेश प्रकाशीत होतात. त्यांची हुशारी ते जे काही सांगतात बोलतात यावर जर पुस्तक लिहिले तर ते फार सुदर होईल.युध्दे, झगडे इ. वर लिहीण्यापेक्षा मुलांच्यावर लिहीणे अधिक चांगले. मुले कधी फॅशनच्या नादी लागत नाही. ते आपला पोषाख व्यवस्थित करतील लोकांत व्यवस्थित वागतील. अगदी स्वत:च्या विचाराने स्वत:च्यात पध्दतीत, स्वत:ची पत ठेवून वागतील. कुठल्याही खराब गोष्टींचे प्रदर्शन न करता, स्वत:च्या निरागसतेच्या जाणीवेत असतात. काही लोक आपल्या



मुलाकडे दुर्लक्ष करतात. पैशाची समस्या किंवा पतिपत्नीतील संघर्ष यामुळे मुलांकडे दुर्लक्ष होते. मग ते कुठेही बहकतील. असे करणे म्हणजे हे महापाप समजले पाहिजे. कुटुंबातील मुलांचे स्थान गौण समजू नये. घरातील सगळ्यांनी त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. कुठलीही गैर गोष्ट त्यांच्यावर लादली जाऊ नये. त्यांच्या निरागसतेमुळे जे चूक आहे ते त्यांना समजते.

मुलांना कुठलीही गोष्ट लवकर समजते, लवकर शिकतात.विस्तवासारख्या कुठल्याही गोष्टीला हात लागला आणि इजा झाली तर पुन्हा त्या वस्तूला हात लावत नाही.अशारितीने ते वाढत असताना मोठयांनीही काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजे. आपण त्यांच्याशी हळूवारपणे, ममतेने वागण्यास शिकले पाहिजे. कुठेही गेले, की मोठया लोकांना उणेदुणे काढण्यात रस असतो. पण मुलांचे तसे नसते कुठेही गेले तर ते तेथील चांगल्या गोष्टी पाहतील, 'त्या घरात श्री गणेशाची सुंदर मूर्ती होती' अशाप्रकारच्या चांगल्या बाबींकडे त्यांची दृष्टी असते.


सध्याच्या मॉर्डन वातावरणात मुले विचित्र स्वभावाचे बनु शकतात, त्यांच्या डोक्यात वाईट गोष्टी घुसू शकतात.विशेषत: टेलिव्हिजनवरील दृश्ये त्यांना बिघडवू शकतात.वाईट आवड निवड निर्माण करतात..अत्याचार , हाणामारी अशी दृश्ये त्यांना आवडत नाहीत. पण जेव्हां घरातील मोठया लोकांबरोबर ते पहातात तेव्हा त्यांच्यापासून ते विपरीत परिणाम करतील, या गोष्टीं त्यांच्यापासून दूर ठेवल्या पाहिजेत.त्यांना सांभाळले पाहिजे.त्यांच्यातील निष्पापतेचा आदर राखला पाहिजे. मुलांना मारहाण करणारे लोक मला बिलकुल आवडत नाहीत. सर्व त्यांच्यावर सोपवा त्यांच्या चांगल्या वागण्याची निरागसतेची तारीफ करा, बिघडलेल्या समाजाची जाणिव करुन देऊ नका, ज्यामुळे ते बिघडतील.विशेषत: पैशाची लालूच दाखवू नका ज्यामुळे ही लालूच निर्माण होईल अशा गोष्टी पासून त्यांना दूर ठेवा.

आजकाल लोक फार पैशाच्या मागे लागलेले दिसतात. गैरमार्गाने पैसा मिळवणे हा मुर्खपणा आहे. एखाद्याला वाटते पंचविस गाडया हव्यात, तो त्या पंचविस गाड्यात बसणार आहे का? दुसऱ्याचे पैसे लुबाडून त्रास देऊन फसवेगिरी करुन मिळविलेल्या संपत्तीपेक्षा,गरीब, असणे उत्तम. हा चुकीचा मार्ग म्हणजे उजव्या बाजूला झुकणे (Righat Side)

सहजयोगात आपण आधी श्री गणेशांना प्रस्थापित केले जे आपल्या डाव्या बाजूवर आहेत.तर प्रथम तुमची डावी बाजू भक्कम करा, मग उजवीकडे या, सर्वकाही ठीक होईल म्हणून आपण सहजयोगाची उभारणी 'श्री गणेशांवर केली आहे. एकदा गणेश प्रस्थापित केले की सर्व व्यवस्थित असते, सर्व सूज्ञता असते, सर्वकाही स्वच्छ दिसते, कसे रहावे, कसे वागावे. मूर्खता, ईर्षा, हाव या गोष्टींपासून तुम्ही दूर असता.

सुंदर कुटुंबव्यवस्थेत, उत्तम शालेय शिक्षण, प्रेम, उत्तम मार्गदर्शन यामुळे त्यांची वाढ उत्तम होऊन मुले सुंदर घडतील, सर्व सहजयोगी आपल्या मुलांचा योग्य सांभाळ करतील, त्यांची मुले अशा गुणांची व्हावीत असा मी आशिर्वाद देते. कारण ते उद्याचे 'सहजयोगी'होणार. त्यांच्या उगम निरागसतेतून झाला. त्यामुळे ते शुध्द आहेत. त्या शुध्दतेचा आदर ठेवा. तीचे रक्षण करा. तर मुलांचे महत्व जाणून त्यांच्यातील गणेशतत्व विकसित करु या.

तुम्हाला सर्वांना अनंत आशिर्वाद









### आत्मसाक्षात्कारी संत

# संत कबीर

प.पू. श्रीमाताजीनी संत कबीर हे आत्मसाक्षात्कारी संत असल्याचे अनेक वेळा सांगीतले आहे.

संत कबीरांचा जन्म हा बरीच विद्वान मंडळींच्या तर्क - वितर्कानुसार सन १३९९ च्या आसपास झाला असावा अशा निर्णयाप्रत येऊन पोहचली आहेत. त्यांच्या जन्माबाबत पुढील दंत कथा प्रचलित आहेत.

एका ब्राह्मण विधवेच्या पोटी कबीरांच जन्म झाला व त्या माऊलीने लोक-लज्जेस्तव काशीच्या लहरतारा तलावा जवळ लहानग्या बाळास सोडून दिले. तेथून 'निरु' व त्याची नववधू :निमा' हे जुलाहा दाम्पत्य काशीकडे येत होते.त्याच दिवशी त्यांचा 'गौना' झालेला होता. हातपाय धुण्यासाठी तलावाजवळ थांबले असता त्यांना लहानग्या बाळाचा रडण्याचा आवाज एका झुडपातून येताना जाणवला.त्याठिकाणी त्यांना एक सुंदर नवजात बालक पडलेले दिसले. त्याचे तेज पाहता त्यांनी लोकलाजेची पर्वा न करता त्या बालकास आपल्या सोबत घरी घेऊन आले.

मुलाचे नामकरण विधी करण्यासाठी त्यांनी काजीला बोलविले. काजीने कुराण उघडले त्यावेळी प्रत्येक ठिकाणी कबीर, कुब्रा, अकबर आदि शब्द मिळाले. अरबीमध्ये हे शब्द महान परमात्म्या करीता येतात. काजी चकीत झाले होते. दरवेळी कुराणात पहाताना तेच शब्द मिळाले. ही वार्ता ऐकून आणखी काजी तिथे आले. शेवटी त्यांनी नीरुला सल्ला दिला की, त्या मुलाला मारुन टाक, अन्यथा मोठी अपत्ती ओढावणार आहे. नीरु-निमा मात्र एवढे क्रूर काम करु शकले नाहीत. शेवटी या मुलाचे नाव 'कबीर' ठेवले गेले. तोच पुढे भारतातील महान संत कबीर म्हणून प्रसिध्द झाला.

कबीरांच्या जन्माविषयी आणखी एक दंत कथा हिंदू समाजात प्रसिध्द आहे. एक ब्राह्मण आपल्या विधवा मुलीसोबत स्वामी रामानंदाच्या दर्शनाला गेला त्यावेळी मुलीनेही रामानंदाच्या पायाला स्पर्श केला. रामानंद आपल्या इश्वरी चिंतनात समाधिस्त होते. त्यांच्या लक्षात आले नाही की, पायास कुणी स्पर्श केला व अचानक त्यांच्या तोंडून शब्द निघाले 'पुत्रवती भव' आणि हाच गुरु कृपेने लाभलेला मुलगा सामाजिक बंधनाला बळी पडून जन्मदात्या आईपासून दुरावला जावून पुढे संत कबीर म्हणून उदयास आला.

संत कबीरास लहानपणी आई (निमा)च्या आग्रहास्तव त्याच्या वडिलांनी (नीरु) शिक्षणासाठी मदरसांच्या प्रमुखाकडे नेले. त्यांनी त्याला झिडकारले. तसेच गुरुकुलातील ब्राह्मणांनीही कबीराचे नाव शिकण्यासाठी दाखल करवून घेण्यासाठी गेलेल्या नीरुला धक्के मारुन बाहेर काढले होते. तेव्हापासून कबीर एकलव्या प्रमाणे एकांगी विद्या ग्रहण करु लागले. त्यांनी आपली शाळा बनवली भटकंती, शिक्षक बनविले सत्संग आणि पुस्तक बनविले समाज.

लग्न करुन संसारी झाल्यावरही ते उदासिन रहायचे. त्यांची पत्नी 'लोई' ती फार पतीव्रता होती. त्यांना 'कमाल' व 'कमली' नावाची मुले होती. मुलगा अत्यंत धनलोलूप व स्वार्थी निघाल्यामुळे कबीर त्यावर नाखूष असत. कबीरांचे अध्यात्मिक गुरु स्वामी रामानंद होते असा आधारभूत संकेत काढला गेला. ते नेहमी ईश्वरी विषयक ध्यानाच्या तंद्रीत असत त्यांच्या तोंडून निघालेले उत्कृष्ट बोल कवितेचे रुप धारण करीत. कबीरांच्या साहित्यात प्रामुख्याने पुरवी, खडी, राजस्थानी, पंजाबी, भोजपूरी, अरबी आणि फारसी भाषांचा समावेश आढळतो. सत्संगतीत राहूनच त्यांनी अक्षर ज्ञानासोबत विविध योगी,



तपस्वी, संन्यासी, सुफी संप्रदाय, नाथ संप्रदाय, योग संप्रदाय, हठयोग आदिचाही सूक्ष्म अभ्यास केला. वैचारिक परिपकता, आचरणातील शुध्दता, संसारिक विरक्तता, शीलाची सत्यता इत्यादी गुणाने युक्त संत कबीरांकडे लोक आकर्शित झाले. त्यांचे सत्यावर आधारलेले वक्तृत्व धारदार होते. विषारी बाणापेक्षाही प्रलंयकारी होते. रुढी, संस्कार, अंधश्रध्दा यावर त्यांचा सारखा मारा होता.

त्यांचे साहित्य मुख्यत: तीन काव्य प्रकारात आहे. साखी, सबदी आणि रमैनी हे तीन प्रकार असून त्यात 'साखी' दोह्याच्या स्वरुपात असून 'सबदी' पदांच्या स्वरुपात आणि 'रमैनी' हे मुख्यता दोहे आणि चौपाईचा प्रयोग करण्यात आला आहे. 'रमैनी' ची संख्या तर सहा लाखा पेक्षाही अधिक आहे. संत कबीरांचे गोर-गरीब, हिंदु-मुस्लिमांतील प्राबल्य जसजसे वाढत जाऊ लागले तसे धर्माचे त्यावेळचे ठेकेदार पंडीत-मुल्ला यांनी आपले हित धोक्यात आल्याचे पाहून त्यांना सळो की पळो करुन सोडले. त्यावेळी एकादा त्यांचा कट्टर विरोधक 'शेखतकी' च्या म्हणण्यानुसार कबीरांना 'सिकन्दर लोदीच्या' दरबारात अणण्यात आले. त्यावेळी त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा ऐकवली. त्यांना अग्नीकुंडात टाकण्यात आले. परंतु ईश्वराने त्यांचे रक्षण केले व ते सुखरुप बाहेर आले . त्यानंतर त्यांना मस्तावल्या हत्तीद्वारा मारण्याचा प्रयत्न झाला. पण हत्ती त्यांच्यासमोर गुडघे जमिनीवर टेकून नमस्कार केल्यागत जोराने चित्कार करुन निघून गेला अशा तर्हेने त्यांना मारण्याचा बेत फसला.

त्यांनी मुस्लिम-हिंदू धर्मातील भक्तिमार्गातील अतिरेकांचे सारख्याच प्रमाणात वाभाडे काढले.त्यांचा जाती-जातीतील भेद भाव, बळीची प्रथा, हिंसा, तिर्थ, व्रत, उपास खतना मूर्तीपूजा इ. विरोध केला. सिख धर्मियात सर्वाधिक सन्मान दिल्या जाणारा 'गुरु ग्रंथ साहब' या पवित्र ग्रंथात संत कबीरांच्या सिखांच्या दहा धार्मिक गुरुंचे अनमोल वचन कोणतेही बदल न करतां मुद्रित केलेले आहेत.त्यामुळे गुरु ग्रंथ साहेब च्या रुपातही ते दिव्य संदेश देत आले आहेत.

अंतराष्ट्रीय ख्यातीप्राप्त कवी रविंद्रनाथ टागोर यांनी आचार्य क्षितीमोहन सेन यांच्या ग्रंथातून संत कबीरांचा १०० पदरचना घेऊन इंग्रजीत अनुवाद केला आणि 'गितांजली' हा काव्य ग्रंथ रचला. याच ग्रंथाला पुढे 'नोबेल' पारीतोषिक बहाल केले. 'रेवरंड वेस्टकॉट' या पाश्चात्य लेखकानेही कबीरावर विस्तृत आणि गंभीर असे प्रामाणिक शोध प्रबंध करुन इंग्लंड सारख्या देशात पुरस्कार मिळविला. 'डॉक्टर की' यांनीही बरेच महत्वपूर्ण लेखन केले आहे. 'कबीर ॲण्ड हिज फॅलोअर्स' हा आपला शोध प्रबंध लंडन विश्वविद्यालयात सादर करुन 'डी.लीट्' ही सन्मानीय उपाधी प्राप्त केली.

त्यांच्या मृत्यू सन १५१८ मध्ये झाला. त्यावेळी हिंदू-मुस्लिमांच्यात वादंग झाले. हिंदू म्हणू लागले की त्यांना अग्नी देणे आवश्यक आहे तर मुस्लिम म्हणू लागले त्यांना दफन करणे आवश्यक आहे. ज्यावेळी त्यांच्या पार्थवी देहावरील चादर काढली त्यावेळी त्याठीकाणी त्यांचे शरीर अदृश होऊन गुलाबाची फुले तयार झाली. हिंदूनी निम्मी फुले अग्नी दहन केली तर मुस्लिमांनी त्याचे दफन केले असे सांगीतले जाते.

●●●

---

कबीरांच्या दोह्यातील काही दोहे पुढील प्रमाणे आहेत.

आया था किस काम को, सोया चादर तान ।
सूरत संभाल ले गाफिला, अपना आप पहिचान ॥

हे गाफील माणसा! तू ज्या कामासाठी या संसारात आलास ते सोडून फक्त चादर ओढून झोप काढतोस. हे बरे नव्हे; जरा निरीक्षण कर आणि स्वत:ची ओळख करुन घे (आत्मसाक्षात्कार करुन घे). स्वत:ची ओळख खऱ्या अर्थाने झाली (कुण्डलीनी जागृत करुन घेतली) अशी कितीतरी सामान्य माणसे असामान्य झालीत.

पानी बिच मिन पियासी।
मोंही सुन-सुन आवै हाँसी ॥
घर में वस्तु नजर नही आवत ।
बन-बन फिरत उदासी ॥
आतम ज्ञान बिना जग झूंठा।
क्या मथुरा, क्या काशी ॥

पाण्यात असलेली मासोळी तहानलेली आहे हे ऐकून मला हंसू येते. घरी इष्ट वस्तू असून दिसत नाही आणि उगाच रानावनात फिरतोस ? अरे आत्मज्ञाना शिवाय सगळे झूठ आहे. कसली मथुरा आणि कसली काशी पाहतोस.(कुण्डलिनी जागृत करुन आत्मसाक्षात्कार प्राप्त करुन घेणे हा ऐकमेव आपल्या जन्माचा उद्देश आहे.)





माटी कहे कुम्हारसे, तु क्यो रोंदे मोहे ।
एक दिन ऐसा आयेगा, मै रौदुगी तोहे॥

नश्वरतेचा मर्मभेदी दाखला देतांना संत कबीर सांगतात, माती कुंभाराला म्हणते ''अरे, आज तू मला तुडवतोस. पण लक्षांत ठेव एक दिवस असा येईल की मीही तुला तुडवणार आहे.''परमसत्य Absolute Truth जाणणे हे खरे मानवी जीवनाचे मर्म आहे, बाकी सर्व नश्वर आहे.

कबीर यह जग अंधला, जैसी अंधी गाइ ।
बछा था सो मरि गया, ऊभी चौम चटाई ॥

या संसारातील लोक आत्मसाक्षात्कार न झाल्यामुळे आंधळे आहेत, अज्ञानी आहेत, आंधळ्या गायी सारखे आहेत. जसे वासरू मेल्यावरही, ते जीवंत असल्याच्या भ्रमात उभी राहून गाय त्याचे अंग चाटत असते. मनुष्य प्राणीही काहीसा असाच भौतीक सुखाच्या मोहात अडकून जीवन जगत असतो.

जब लगि ढोला, तब लगि बोला, तब लगि धन व्यवहार।
ढोल फूट धन गया, कोई न झाँके द्वार॥

जो पर्यंत हे शरीररुपी ढोल (कवच)आहे तोपर्यंत आवाज आहे आणि धनाचा व्यवहार देखील! ढोल एकदाचा फुटला अर्थात शरीर नष्ट झाले म्हणजे कोणीही दारात ढूंकून पाहायला येत नाही.

झुठे सुख को सुख कहें, मानत है मन मोद ।
खलक चबीणाँ काल का, कुछ मुख मै कुछ गोद ॥

लोक क्षणभंगूर सुखाला (भौतिक) सुख समजतात आणि प्रसन्न राहतात. कालचक्राच्या फेऱ्यात हा त्याचे फुटाण्यासारखा आहार आहे. काही त्याच्या तोंडात आहेत तर काही त्याच्या जवळ आहे.

झीन झीनी बीनी चदरिया।
काहै का ताना भरनी, कौन तारसे बीनी चदरिया।
इंगला - पिंगला ताना भरनी, सुसमन तार से बीनी चदरियौ ॥
आठ कँवल दल चरखा डौले, पाँच तत्व गुण तिनी चदरियाँ ॥१॥
साई को सियत मास दस लागै, ठोक-ठोक के बीनी चदरीयाँ ।
सो चादर सुर नर मुनि, ओढिन-ओढि को मैली कीनी चदरीयाँ ।
दास कबीर जतन से ओढिन, ज्यो के त्यों धर दीनी चदरीयाँ ॥२॥

हे शरीर एका चादरी सारखे आहे. त्याला विणायला लागणारे ताने आणि भरणी म्हणजेच इंगला-पिंगला नाडी(इंगला -पिंगला नाडी मधूनच सामान्य मानुष्य काम करतो.) त्यात नामस्मरणाची तार (सुषुम्ना नाडी) वापरली आहे. ही चादर आठ कमलांचा (चक्रे)चरखा फिरवून तयार होते आणि पाच तत्वे यात वापरली आहेत. विणणारा ही चादर जवळ-जवळ दहा महिने ठोकून-ठोकून विणतो, ही अद्भूत चादर देव, मानव मुनि वापरतात व ती पांधरुन मळते.

### काही पुढील व्यवहारी पण अर्थपूर्ण दोहे

दंत कहे जिभको, हम है बत्तीस तु है अकेली माय ।
इक बार चबा जाय तो, फिर्याद कहाँ जाय ॥
जिभ कहे दंत को, तुम बत्तीस हो मै हु अकेली माय ।
इकबार टेढी चलु, बत्तीस गीर जाय ॥

<u>मुस्लिम बांधवांसाठी</u>

दिन भर रोजा रहत है, राति हनत है गाय ।
यह तो खून वह बंदगी, कैसे खुशी खुदाय ॥

<u>हिंदू बांधवांसाठी</u>

बकरी पाति खाती है ताको काढी खाल ।
जो नर बकरी खात है, तिनक कौन हवाल ॥

दिवसभर खुदाचे नाव घेऊन 'रोजा' (उपवास)पाळता पण रात्री गायीची कत्तल करुन तीचे मांस खाता यामुळे खुदा कसा काय खुष होणार. तसेच बकऱ्या पाळता त्यांच्यासाठी शेळ्यामेंढ्यांची व्यवस्था करता नंतर त्यांनाच कापून खाता तसेच त्याचे चांबडे विकून टाकता.

●●●



# अमृत वाणी

ध्यान

अमेरिकेत नुकत्याच झालेल्या दीपावली २००२ च्या पूजेमधे श्रीमाताजींनी ध्यानाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले आहे. त्या उपदेशाचे सतत चिंतन व मनन करुन ध्यानामधे गहनता मिळविण्याचा सातत्याने प्रयत्न करणे प्रत्येकाला आवश्यक आहे असे त्यांनी समजावले आहे.या उपदेशातील काही महत्वाची अमृतवचने

- प्रत्येक दिवशी ध्यान करणे आवश्यक आहे.
- तसे न केल्यास सहजयोगाच्या प्रगतीमार्गावरुन तुम्ही खाली घसरण्याची शक्यता आहे.
- जे योगी नियमित ध्यान करीत नाहीत किंवा ध्यानाशिवाय सहजयोग होतो असे समजतात ते ही फार मोठी चुक करीत असतात.
- ध्यान हे दिव्यातल्या तेला सारखे आहे. ध्यान झाले नाही तर तुमच्यामधील प्रकाश कमी होतो.
- ध्यान म्हणजे''काही करणे'' नव्हे तर फक्त निर्विचार जाणिवेमधे रहाणे.
- कितीवेळ निर्विचारता येते याला महत्व नाही. क्षणभर निर्विचारता मिळाली तरी ती हळूहळू वाढत जाणार आहे.
- फक्त निर्विचारतेमधेच तुम्ही सत्याशी खऱ्या अर्थाने संपर्कात येता व आपल्या आतमध्ये शांति अनुभवता.
- ध्यान न करणारे योगी सदैव अस्वस्थ असतात, कसल्या ना कसल्या तरी गोंधळात पडतात आणि स्वत: भोवती अडचणी निर्माण करतात.
- निर्विचारतेमधून परिस्थितीचे स्पष्ट आकलन होते आणि त्याचबरोबर आपल्यामधिल ''निगेटिव्ह'' विचार दुर होतात.
- निर्विचारता जोपासणे ही एक फार मोठी शक्ती आहे आणि त्यातुनच तुमची परमात्म्याविषयीची श्रध्दा बळकट होते.
- सातत्याने ध्यान न केल्यास सहजयोगात म्हणावी तशी प्रगती होत नाही.



- निर्विचारता मिळविणे आवघड आहे असे बरेचजणांना वाटते. पण सातत्याने लक्षपूर्वक प्रयत्न केल्यास एक एक सेकंदाने ही निर्विचारता वाढत जाते.





# आत्मपरीक्षण

शुडि कॅम्प, इंग्लंड, प.पू श्रीमाताजी निर्मलादेवींचा सहजयोग्यांना उपदेश (संक्षिप्त)

सहजयोगात आल्यावर त्याच्यामधे स्थिरावणे व प्रगल्भ होणे यासाठी आत्मपरिक्षण केलेच पाहिजे.

आपल्या कोणत्याही कार्यक्रमांत अनपेक्षितपणें जेव्हां कांही अडचणी येतात व त्यानुसार बदल करावे लागतात त्यावेळीं अशा घटनांच्या मागेही कांही परमेश्वरी हेतू असतो हे आपण लक्षांत घ्यायला हवे. त्याचबरोबर अशा घटनांचा आपण मनापासून स्विकारही केला पाहिजे. समजा मी एखाद्या ठिकाणी जात आहे आणि मधेंच आपला रस्ता चुकल्याचे कुणाच्या लक्षांत आले तरी माझे कांही बिघडत नाहीं कारण मी माझ्या स्वत:बरोबरच रममाण असते आणि या चुकीच्या रस्त्यावर माझें येणे आवश्यक आहे हे मी जाणते. ही समज तुमच्यामधें आली आणि त्याचे समाधान तुम्हाला हृदयापासून झाले की जीवनामधें एरवी जाणवतो त्याच्यापेक्षांही किती मोठा आशय आहे हे तुमच्या लक्षांत येईल.

आजची गोष्ट पहा; आपण सर्वांनी ठरवलेला सार्वजनिक प्रोग्राम आयत्या वेळीं रद्द करावा लागला; पण त्याच्या पाठीमागचे लक्षांत घ्यावयाचे कारण हेच की अजून आपण आत्मसाक्षात्कारामधें रुजलो नाहीं व प्रस्थापित झालो नाहीं. वृक्ष रुजल्यावर त्याची पहिली वाढ सुरुवातीला एका विशिष्ट दिशेने कांहीं काळ होत असते पण नंतर ती, सूर्यप्रकाश मिळत नाहीं व पाण्याचा ओलावा मिळत नाहीं अशा कांहीं कारणाने बदलते. त्याचप्रमानें आपणही परमात्म्याच्या हातातील बाहुले असतो हे आपण विसरतां कामा नये. म्हणून सहजयोगातही अशा घटना घडतात तेव्हां आपणही त्याच्यामागचा अर्थ लक्षांत घेतला पाहिजे. म्हणून मी म्हणते कीं सहजयोग मिळाल्यावरही त्यामधें स्थिरावणें, प्रगल्भ होणे महत्त्वाचे आहे.

त्यासाठीं सर्वप्रथम तुम्ही आत्मपरीक्षण केले पाहिजे; म्हणजे आपल्याला मिळालेल्या प्रकाशामधेंच आपल्याकडेच पाहिले पाहिजे. 'मी सहाजयोगासाठीं काय करतो, मी सहजयोगामधें किती प्रगत झालो आहे, मला आणखी काय साध्य करायला हवे, माझ्यामधें अजून काय दोष व तृटि आहेत?' असे प्रश्न स्वत:ला विचारा; त्यामधें अगदी नि:पक्षपणा हवा; स्वत:च्या वागण्याचे समर्थन करण्याची, दुसऱ्याचे दोष वा चुका पाहण्याची किंवा दुसऱ्यांच्या बाधांवर अपयश ढकलण्याची प्रवृत्ति नसावी. असे स्वत:कडे पाहू लागलात की स्वत:च्या प्रगतीआड येणारे आपलेच दोष तुम्हाला जाणवतील आणि ते सुधारण्याकडे तुमची प्रवृत्ति वळेल. आत्मप्रकाशांत आल्यावरच हे शक्य होते आणि प्रत्येक घटनेचा अर्थ लक्षांत येतो.

मला जाणवलेली एक विशेष बाब अशी की सहजयोग्यामधेंही 'माया' आपले काम करत असते. त्यामुळेंच सहजयोगी पण कमी-जास्त प्रमाणांत अज्ञानांत वावरत असतात. तुम्ही सहजयोगांत आलात की तुम्हाला सर्व प्रकारचे आशीर्वाद मिळत असतात; तुमचे कुटुंब, मुले-बाळे नीट नांदू लागतात, कुणाचे आजार बरे होतात, कुणाला नोकरी-धंदा मिळून आर्थिक विवंचना संपतात, कुणाला चमत्कार वाटावा असे अनुभव येतात. पण बरेचसे लोक एवढ्यावरच समाधानी झाल्यासारखे थंडावतात आणि सहजयोगाच्या गहनतेपासून दूरच राहतात. पण हे खरे नाहीं; खरे तर या गोष्टी तुम्हाला आधार म्हणून मिळालेल्या असतात; तुमची श्रध्दा मुळापासून बळकट होण्यासाठी हे आशीर्वाद असतात. मी कोण आहे, माझे खरे स्वरुप काय आहे याचे



भान तुमच्यामधें सदैव जागृत असले पाहिजे.पण त्याऐवजीं थोड्याफार प्रापंचिक समाधानावरच तुम्ही संतुष्ट राहिलात तर पुढच्या संकटांचा सामना करुं शकणार नाहीं आणि कुणाचा तरी शाप लागला अशी चुकीची समजूत करुन बसाल.

आंता कांहीं लोकांना या गोष्टी जाणवायला वेळ लागतो हेहि खरेच. आजकालची परिस्थितीच अशी आहे की पैसा मिळाला की सर्व कांही ठीक होते अशी सर्वसामान्य लोकांची भावना असते.पण हे खरे नाहीं. खरे आशीर्वाद मिळणें म्हणजे तुम्ही अंतर्यामी शांत होणें, साक्षीभाव बळकट होणें, चैतन्यलहरींची भाषा समजणें आणि संतुलनांत राहून उन्नतीमार्गावर अग्रेसर बनणें; हे खरे आशीर्वाद; त्याच्या बरोबरच सर्व कांहीं मिळत असते. ही पूर्णता येण्यासाठी आनंदाच्या डोहांतच उतरल्यासारखी तुमची स्थिति बनली पाहिजे. नाहींतरी आनंद मिळवण्यासाठींच माणसांची सारी धडपड असते ना?. पण पैसा, नोकरी, रोगमुक्ति, यश इ. मिळालेली माणसेही समाधानी दिसत नाहींत, कसल्या ना कसल्या काळज्या व प्रश्न त्यांच्यामागे लागतातच, त्यामुळें वैतागून जीवनांतील आनंद गमावून बसतात.

म्हणून तुम्हाला मिळालेले सर्व आशीर्वाद, जीवनातील सर्व चांगले बदल वा अनुभव हे तुमच्या कल्याणासाठींच घडून आणले जातात हे तुमच्या नीट लक्षांत आले पाहिजे; तुमचे कल्याण तुमची अध्यात्मिक उन्नति होण्यांतच आहे; इतर कशांतही नाही; ते सर्व व्यर्थ व निकामी आहे. हे साध्य करणें हेच जीवनाचे उद्दिष्ट असल्याचे तुम्हाला समजले आणि त्याचा आनंद तुम्ही उपभोगूं शकला की सर्व कार्यान्वित होणार आहे. सहजयोगामधें सर्व प्रेम व करुणेमधून होत असते, कसलीही बंधने वा नियम नसतात. तुम्हीच तुमची उन्नति साधायची असते आणि आत्मा हाच तुमचा मार्गदर्शक आहे. तुमच्या मागे कुणी सारखं लागणारे व तुम्हाला ठीक करणारे दुसरे कोणी नेहमी नसतात. तुम्हीच स्वत:कडे लक्ष ठेऊन ते कार्यक्षम बनवायचे असते.

त्याबाबतीत एक निदर्शक म्हणजे तुम्ही सहजयोगासाठी व माझ्यासाठीं काय केले व करत आहांत ह्या दोन गोष्टींकडे तुमचे लक्ष असले पाहिजे. समजूतदारपणा ठेवलात की हे परमेश्वरी करण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे दुसरे कांहीं नाही हे तुम्हाला जाणवेल; हे कार्य करण्याचे भाग्य आपल्याला मिळत आहे हीच भावना प्रबळ होऊं दे. कुणाला वाटेल आपण सामान्य सहजयोगी आहोत पण तुम्हाला त्याचसाठी निवडलेले आहे हे कायम लक्षांत ठेवा. मी सहजयोगांत का आलो, सहजयोगासाठी मी काय करुं शकतो व काय करतो याचे भान तुमच्या मनांत सदैव जागृत राहिले पाहिजे. सहजयोगांत आल्यावर नोकरी-पैसा मिळाला पाहिजे, कुटुंबातील प्रत्येकाचे सारं ठिक झाले पाहिजे अशा भावनांना वा विचारांना मनांमधे अजिबात थारा देऊं नका. आपण किती लोकांना सहजयोग सांगितला, किती लोकांना जागृति दिली हेच सतत पहा; मग त्यापैकी कोण व किती सहजयोगांत आले हे गौण आहे कारण आज ना उद्या ते येतील. तुम्ही तुमच्या बाजूने सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे.ह्या सर्व गोष्टी आत्मपरीक्षण केल्यानंतरच समजतात.

तुम्ही सहजयोगी आतां 'संत' झाला आहात. संतांना सर्व मानवजातीबद्दल कळकळ व प्रेम असते. त्यांच्या हृदयांत करुणा भरलेली असते. शिवाय तुम्हाला सर्व शक्ति मिळाल्या आहेत. आज जगभरात

एक प्रान द्वै देह है, द्विविधा नहिं यामें।
गर्व कियो नरदेह तै, मै रहों, न तामें ॥
सुरज-प्रभु अंतर भए, संग तजि प्यारी ।
जहँ की तहँ ठाढी रही, वह घोषकुमारी ॥

भगवंताशी तुम्ही एवढे एकरुप होऊन जा की तुमचं आणि भगवंताचं बाह्यरुप वेगळं असलं तरी आत्मरुप एकच होऊन जाईल. तुमच्या जगात, संसारात जे जे तुम्हाला आवडतं, प्रिय वाटतं सर्वात जास्त तुमचा 'अहं' तुम्हाला प्यारा, (अहंकार)त्यामुळे तो सोडायला अत्यंत कठीण; पण त्याचाही त्याग करण्याचं बळ हरीकृष्ण कृपेने मिळवाल तर हरीत आणि तुमच्यात द्वैत उरणार नाही.(आपल्या कुण्डिलनीला सहस्रार पार करावयाचे असल्यास आज्ञाचक्रावर सर्वांना क्षमा करणे आवश्यक असून अहंकार नष्ट होणे आवश्यक आहे.)

\- संत सूरदास



सर्व मानवजातीसमोर गंभीर प्रश्न आहेत. नुसते राजकारणी, बुध्दिवान मंडळींकडून हे प्रश्न सुटणार नाहींत-तुम्हालाच त्यासाठीं कार्य केले पाहिजे. स्वत:च्याच संकुचित क्षेत्रांत अडकून राहिल्यास लोकांचे प्रश्न तुम्हाला समजणार नाहींत. म्हणून जगांत माणसांना काय व्यथा-प्रश्न आहेत हे समजून घ्या आणि माणसांबरोबरच तुम्हाला रहायचे आहे म्हणून त्यासाठीं सहजयोगातून कार्य करण्याचा प्रयत्न करा. त्यासाठीं प्रार्थना करा. सामूहिकतेमधून हे झाले पाहिजे. तुमचे स्वत:चे व सामुहिकतेचे चित्त जगभरांतील मानवजातीच्या प्रश्नांकडे लागले पाहिजे. मगच तुम्ही खऱ्याअर्थाने संत बनाल अणि परमेश्वराची प्रार्थना करुन ते प्रश्न सोडवण्यासाठी त्याचीच मदत घ्या-ही तुमची जबाबदारी आहे व हे कार्य तुम्ही केलेच पाहिजे. माझीही तीच इच्छा असल्यामुळें तुमच्या या कार्याब्द्दलच्या सर्व इच्छा पूर्ण होणार आहेत. आईचे प्रेम, करुणा, जिव्हाळा व संरक्षण सर्व कांही तुमच्यासाठींच आहे हे विसरुं नका. पण जगातील सर्व मानवजातीबद्दल आस्था व करुणा बाळगून त्यांना मदत करण्याची जबाबदारी तुमची आहे व हे कार्य तुम्हालाच करायचे आहे. माझ्या बाजूने मी ते करणार आहे. जगांत कुठेही कांही कठिण परिस्थिति निर्माण झाली तर तुमचे सामूहिक चित्त तिकडे लावा म्हणजे कार्य होईल. सामूहिकतेमधूनच हे महान कार्य होणार आहे हे लक्षांत घ्या.

तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे म्हणजे तुम्ही प्रकाशांत आला आहांत, तुम्ही सामान्य मानव नसून एका उच्च स्थितीला पोचलेले श्रेष्ठ मानव आहांत. ही तुमची प्रतिष्ठा नीट ओळखा व हा प्रकाश सगळीकडे पसरेल असे बघा. ख्रिस्त म्हणाले होते की दिवा टेबलाखाली ठेवू नका, टेबलावर ठेवा म्हणजे त्याचा प्रकाश जास्त पसरेल. तसे तुमचे व्यक्तिमत्व उच्च स्तराबरचे बनले तरच तुमच्यामधील प्रकाश बाहेर पसरणार आहे. त्यांतुन तुम्ही स्वत:ही सुधारणार व इतरांनाही सुधारणार. त्यासाठीच तुम्हाला सहजयोग मिळाला आहे. व सहजयोगाचे हे ऋण तुम्हाला फेडायचे आहे. आपण नीतिमत्ता बाळगतो का, आपले वागणे-बोलणे कसे आहे, आपण आपल्या चुका व दोष ओळखून सुधारतो का हे समजण्यासाठी आत्मपरिक्षण फार जरुरीचे आहे. तुम्ही विशेष लोक आहांत, तुम्हाला विशेष शक्ति मिळाली आहे.तुम्हाला अध्यात्मिक जीवनाची जान आली आहे; मग तुम्ही इतर सामान्य लोकांसारखे आपल्याच वैयक्तिक प्रश्न, कुटुंब, प्रपंच इ. मध्येच स्वत:ला बांधून का ठेवता? आईने तुम्हाला सहजयोग दिला, आत्मसाक्षात्कार दिला, प्रकाश दिला तर आई सांगते तसा हा प्रकाश सर्व मानवजातीला पोचवाण्याचे कार्य आपल्यालाच करायचे आहे हे नीट ओळखा व कार्याला लागा. सगळीकडे गुरु म्हणवणाऱ्या लोकांचे पेव फुटले आहे.त्यांना व्हायब्रेशन्स नाहींत, कुण्डलिनी माहित नाहीं तरी लोक त्यांचा उदो-उदो करत आहेत; मग तुम्हां लोकांना स्वस्थ बसून कसे चालेल?

हे सर्व तुमचे तुम्हालाच समजून घ्यायचे आहे व तुम्हालाच त्याचा विचार करुन निर्णय घ्यायचा आहे. त्यासाठी तुमची शुध्द इच्छा, तुमच्या जवळची शक्ति तुमचा स्वत:बद्दलचा प्रतिष्ठितपणा व आत्मसन्मान हे सर्व आतां पणाला तुम्ही लावले पाहिजे. तुम्हाला स्वत:बद्दलचे वैयक्तिक व कौटुंबिक प्रश्न दूर करण्यासाठी आत्मसाक्षात्कार मिळाला या भ्रमांत राहू नका. म्हणून सहजयोग्यांनी आत्मसाक्षात्कारांत प्रगल्भ होणें महत्वाचे आहे व ते सतत आत्मपरिक्षण करुनच मिळणार आहे. मी जिथें जाते तिथें मला लोक गृहीत धरुन वागतात. माझें दर्शन मिळाले, विमानतळावर मला भेटले की सर्व मिळाले असे समजतात. त्याचा काय उपयोग? तुमचे विचार, तुमचे राहणे, तुमचे बोलणे, तुमचे वागणे किती बदलत आहे हे पहा. सहजयोगासाठी तुम्ही काय केले व करतां याचीच नोंद होणार आहे. परमेश्वरापासुन कांहीं लपत नाहीं. मोठमोठ्या गोष्टी करणें, वरवर देखावा करणें याला काही अर्थ नाहीं. म्हणूनच प्रामाणिकपणें आत्मपरीक्षण करुन स्वत:ला पहा व काळजी घ्या. तुम्ही किती लोकांना वाचवले, दुसऱ्या सहजयोग्यांबरोबर आपण कसे वागतो, प्रेम-करुणा शांति आपल्या हृदयात किती आहे, पैशाच्या बाबतीत आपण कसे वागतो, दुसऱ्याला किती समजून घेतो इ. अनेक गोष्टी तुमच्या तुम्हालाच समजल्या पाहिजेत तरच सुधारणा व प्रगति होईल. नाहींतर मी तुम्हाला दिलेला आत्मसाक्षात्कार व्यर्थ ठरेल.

आजची जगभरांतील परिस्थिति फार वाईट आहे. त्यातुन लोकांना वाचवायचे व बाहेर काढणें हे महाकठीण काम आहे.एखादे युध्द खेळण्यासारखे हे कार्य आहे. मनुष्य प्राण्याने आजपर्यंत कधी पाहिले नाही अशा परिस्थितीला तुम्हाला सामोरे जायचे आहे; ह्या भयानक परिस्थितीतून मानवजातीला वाचवून बाहेर काढणें व त्यांच्यांत परिवर्तन घडवून आणणें या महान कार्यासाठीं तुम्हाला सज्ज व्हायचे आहे. मला खात्री आहे की सहजयोगी हे कार्य करतील आणि मानवजातीच्या इतिहासांत सहजयोग्यांची नांवे सुवर्णाक्षरात लिहिली जातील.

सर्वांना अनंत आशीर्वाद





# अनहत चक्र

अनहत चक्राविषयी श्रीमाताजींनी वळोवेळी केलेले उपदेश

- आईचा फोटो तुमच्या हृदयात ठेवा. फोटो हृदयात आहे इकडे लक्ष द्या. '' आई माझे तुझ्यावर प्रेम आहे. कृपया माझ्या हृदयात ये'' अशा तऱ्हेने आईला हृदयस्थ करा. हृदयात सर्व बुधिमत्ता आहे, सर्व क्षमता आहे. सर्व काही हृदयातूनच निर्माण झाले आहे. पण तुमचे हृदय बंद असेल तर मेंदू अनियंत्रित होतो, बाहिर्गामी होतो. हृदयात आत्मा आहे. सर्वांचे तोच नियंत्रण करते. सिंपथेटिक, पॅरासिंपथेटिक, तुमची सर्व उत्क्रांती, ज्ञान, सर्वकाही ज्याच्यामुळें तुम्ही सामुहिक व्यक्ति आहात असे तुम्हाला वाटते.शिवाय आत्मा हाच शुध्द ज्ञान देणारा प्रकाश आहे. म्हणून आत्म्यावरच काम करायला हवे.

- श्री शिव हे सदाशिवांचे आपल्यामधिल प्रतिबिंब आहे. सदाशिव हेच सर्व शक्तिमान परमेश्वर आहेत जे आदिशक्तीची लीला पहात असतात. त्यांनी निर्माण केलेल्या प्राणिमात्रावर पित्यासरखी त्यांची नजर आहे.पण आदिशक्तीच्या या कार्यामध्ये लोकांकडून अडथळा वा विरोध आलेला दिसला की ते रौंद्र स्वरुप धारण करतात आणि अशा लोकांचा किंबहुना साऱ्या जगाचा विध्वंस घडवून आणतात.एकीकडे असा ते प्रचंड संहार करु शकतात, पण तितकेच ते करुणेचा आणि आनंदाचा सागर आहेत. त्यामुळेच सदाशिवांचे प्रतिबिंब जेव्हां आपल्यामधे उतरते तेव्हा आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळतो. आपण आत्म्याच्या प्रकाशात येतो आणि स्वानंदाच्या सागरात उतरतो.

- आलिप्तता हा शिवांचा एक मोठा गुण आहे आणि म्हणूनही तुम्हीपण पूर्णपणे अलिप्त व्हायचा गुण जोपासला पाहिजे. अलिप्तता म्हणजे दुर्लक्ष करा असा अर्थ नाही. जसे वृक्षातील जीवनरस सगळेकडे पोहोचतो, बाष्प होऊन बाहेर जातो आणि पुन्हा पृथ्वीमातेमध्ये येतो, तुमची अलिप्तताही अशी असली पाहिजे. आपला मुलगा म्हणून त्याच्यात गुंतणे, आमका ऑस्ट्रेलियन म्हणून त्याला चिटकणे किंवा आमक्या घराण्यातला किंवा जातीचा म्हणून जवळ करणे अशामुळे तुम्ही अजूनही संकुचित रहाल. ही संकुचितता गळाली पाहिजे तरच तुमची प्रगती होईल. संकुचितपणामुळे मी काहीही केले, तुम्ही स्वत: कितीही प्रयत्न केले तरी तुम्हांला निर्विचार अवस्था प्राप्त होत नाही. निर्विचारता एक अशी सुंदर स्थिति आहे की तुम्ही सर्वांनी ती प्राप्त करुन घेतली पाहिजे.





• तुमच्या जवळ अरसा असेल तर सूर्याचे प्रतिबिंब पडता प्रकाश परावर्तित होईल.ह्याचप्रमाणे मानवातील परमेश्वराचे प्रतिबिंब त्याच्या व्यक्तिमत्वातून परिवर्तित होते. जर तुमचे व्यक्तिमत्व स्वच्छ, शुध्द व अबोधित असेल तर तुमच्यातील परमेश्वराचे प्रतिबिंब आरशाइतकेच स्व च्छ दिसेल. अशाप्रकारे मानव जेव्हां शुध्द आत्मा होतो तेव्हां त्याच्या दैवी शक्तीचे प्रतिबिंब दुसऱ्याच्या मनाचा वेध घेतो.

• जीवनात आपल्यासाठी महत्वपूर्ण कार्य हे आहे की, आपण आपल्यामधिल पावित्र्याला सर्वात उच्च गोष्ट समजणे. पण पवित्र याचा अर्थ असा नव्हे की आंघोळ करुन शुचिर्भूत होऊन सफाई करुन आपल्या शरीराला ठीक करणे तर आपल्या हृदयाला स्वच्छ केले पाहिजे. हृदयाचा सर्वात मोठा विकार आहे क्रोध आणि मनुष्य जेव्हां क्रोधात येतो तेव्हां जे पवित्र आहे ते नष्ट होते. पावित्र्याचे दुसरे नांव आहे निर्व्याज प्रेम जे सतत वहात असते आणि कशाचिही इच्छा करत नाही त्याची तृप्ति यातच आहे की ते सतत वाहत आहे. तर पवित्र याचा अर्थ असा आहे की आपण आपल्या हृदयाला प्रेमाने भरुन टाका. क्रोधाने नव्हे. क्रोध आपला शत्रू आहे पण तो विश्वाचाही शत्रू आहे. तर हृदय विशाल करुन हृदयात असा विचार करा की आम्ही कोणावर असे प्रेम करतो जे निर्व्याज निर्मल आहे. मनुष्याची जी स्थिती आहे त्यापेक्षा आपण खूप उच्च स्थितीला आला आहात. कारण आपण सहजयोगी आहात. आपला योग परमेश्वराच्या या प्रेमाच्या सुक्ष्म शक्तीशी झाला आहे जी आपल्या आत अविरत वाहत आहे. आपल्याला पल्लवित करत आहे.

• शिवतत्व- सोपान मार्ग- सुषुम्ना नाडीचा मध्यमार्ग हाच श्री विष्णूचा मार्ग आहे व त्या मार्गावरुन आपण शिवतत्वापर्यंत पोहोचू शकतो. म्हणजेच मंझिल श्री शिव तर मार्ग श्री विष्णू हा मार्ग तयार करण्यासाठी श्री विष्णू व आदिशक्ती यांनी फार मेहनत केली आहे. त्यामध्ये शिवाचे काही कार्य नाही. ते आपले आरामात बसले आहेत. म्हणून श्री शिवांच्या चरणाशी पोचण्याचा श्री विष्णूंचा मार्ग आपण पत्करला पाहिजे. ते झाले तरच शिवापर्यत पोहोचू. चक्रे ठीक झाली की विष्णू मार्ग उघडतो व त्यातूनच हळूहळू आपले उत्थान होते.डावे हृदय चक्र हे चक्र नसून श्री महादेवाचे प्रतिबिंब आहे. शिवाचे स्थान मस्तकाच्या वर म्हणजे विचार बुध्दी यांच्या पलिकडे आहे. त्या स्थानापर्यंत पोहोचण्यासाठी प्रथम आपले हृदय किती स्वच्छ आहे हे आपण बघितले पाहिजे

• देवी जे करु शकते ते तुम्ही करुम शकत नाही. ते तिचं काम आहे आणि तुम्ही नाही, तर तिलाच करायचं आहे. तुम्हाला फक्त यांत रहायचं आहे. म्हणजे ज्या गोष्टीमुळे ही शांतता वाढेल, त्याच तुमच्यामध्ये शिरकाव करतील आणि परिणामी तुमची गहनता वाढेल. बाकी सर्व काही देवी बघून घेईल. या जगात पसरलेली सर्व घाण, राग, इर्षा सर्व वाईट गोष्टी ती खेचून घेईल. तुम्ही फक्त जे शुध्द असेल त्याचा आनंद उपभोगायचा.



- तुम्ही सर्वव्यापी ईश्वरीशक्तीशी खऱ्या अर्थाने जोडले जाता. एरवी तुम्ही तेथे नसता त्या स्थितीमधे सामावून राहण्यासाठी तुम्ही स्वत:बरोबर अगदी पूर्णपणे शांत नि;शब्द व्हायला हवे. देवी नेहमी शांत असते. युध्द चालू असले तरी ती शांत असते कारण तिचा आत्मविश्वास अढळ असतो. तिला तिची शक्ती माहित असते. महिषासूर तिला काही करणार नाही हे पण तिला ठाऊक असते. ती विचलीत होत नाही कारण तिच्यारुपाने ही शान्त स्थितीच साकार झालेली असते. त्यावेळी ती फार शक्तीशाली बनते. योग्यवेळी ती शक्ती आपणहून कार्यान्वित होते. या स्थितीमधे इतक्या गोष्टी तुमच्या नकळत घडत असतात की तुम्ही आश्चर्यचकित होता.

- आईकडे (देवी)आपल्या मुलांचे रक्षण करायला व त्यांचे संगोपन करण्यासाठी अनेक शक्ती आहेत. त्या शक्ती सतत कोठेही कमी न पडता चोचीस तास कार्यरत असतात, आईला जो शरण जाईल, त्याला अडचणीतून सोडविण्यासाठी त्या शक्ती पुढे येऊन प्रयत्न करतात.परंतु सर्वात प्रथम शरणागति हवी. जर तुम्ही शरणागत नसाल, परमेश्वराच्या साम्राज्यात नसाल तर मात्र ती आईची जबाबदारी नाही. मग कदाचित एखादी विरोधी शक्ति, नियंत्रण मिळवून तुमचा नाश करेल.

- आपल्यामधे जर राम आहेत तर त्यांचा प्रकाश आपल्या चित्तामधे यायलाच पाहिजे. तो कां नाही येणार. आपण तसा प्रयत्न करायला हवा. सहजयोगी म्हणून आपण हे लक्षात घेतले पाहिजे की श्रीरामासारख्या स्थितीतील आपण आलो तर सारे राजकारण संपून जाईल, जेव्हां सर्व सहजयोगी असे ठामपणे म्हणू शकतील की आमच्यामधे श्रीरामाचा प्रकाश आला आहे. तेव्हां आपल्या सर्व समस्या संपून जातील. राजा म्हणून श्रीराम जे करत होते ते अगदी निरिच्छ भावनेने, एक विदेही जीवनासारखे करत होते आणि त्यामुळे साऱ्या प्रजेमध्ये धर्म, प्रस्थापित झाला, त्यांना चांगले शिक्षण लाभले, त्यांची उन्नति झाली. त्यांच्यामधे आदर्श प्रस्थापित झाले.हाच श्रीरामांचा ध्यास होता व त्यासाठीच त्यांनी स्वत:चे जीवन आदर्शरुप ठेवावे लागले.

- सहजयोग्याचे जीवनातील कर्तव्य काय ते पहा. सहजयोग्यांनी देवदेवतांच प्रकाश आपल्या चित्तामधे आणायला हवा. प्रत्येक वेळी श्रीरामांनी किंवा सीतादेवीने काय केले असते हा विचार आधी करा. सहजयोगिनी जर असे करु लागली तर ती घरातील गृहलक्ष्मीच बनेल. आपल्या सर्वांना माहित आहे की सीतेने नंतर अनेक जन्म घेतले, गृहलक्ष्मी म्हणून 'फातिमा' स्वरुपात सीतादेवीच आली.घरीच सदासर्वकाळ घुंघट ओढून ती रहात होती. पण तिच्यामधील शक्ती सर्व कार्य करत होती. स्त्रियांनी सीतेसारखे शुध्द आचरणशील बनले पाहिजे. शुध्द आचरणाची पहिली गोष्ट म्हणजे प्रेम व ममता. स्त्रीशक्तीस्वरुप हा महाशक्तीचा एक सागर आहे आणि त्यातूनच पुरुष आपले कार्य करत असते. म्हणजे स्त्री ही Potential शक्ती व पुरुष ही Kinetic शक्ती आहे.

●●●





# सहज समाचार

पुणे सहजयोग केंद्रातर्फे पुणे परिसरात व ग्रामीण भागात अनेक पब्लिक प्रोग्राम घेण्यात आले. हजारो लोकांना आत्मसाक्षात्काराची जागृती देण्यात आली, त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

१) गणेश उत्सव :- दिनांक १० ते दिनांक २० सप्टेंबर २००२

अशोक विद्यालय, टिळक रोड अलका टॉकिज जवळ दिनांक १४ ते दिनांक १८ सप्टेंबर रोज संध्याकाळी ६ ते रात्री १० पर्यंत जागृतीचा कार्यक्रम झाला. साधारण १८०० लोकांनी जागृती घेतली.

कोथरुड परिसरातील शिवाजी पुतळ्या समोरील पुणे महानगर पालिकेच्या शाळेत सदर काळात ८ दिवस रोज संध्याकाळी ६ ते ९ या वेळात जागृतीचा कार्यक्रम झाला. साधारण १५०० लोकांनी जागृती घेतली.

२) नवरात्री उत्सव :-दिनांक ७ आक्टोबर ते दिनांक १५ आक्टोबर २००२

कोथरुड परिसरातील जय भवानी मंदिर परिसरात सदर कालावधीत रोज संध्याकाळी ६ ते ९ या वेळात जागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला.प्रचंड प्रतिसादात साधारण ४००० लोकांनी जागृती घेतली.

३) पुणे परिसरातील चतुश्रृंगी मंदिराच्या परिसरातील गणेश मंदिर सभागृहात माहे जुन २००२ पासून दर रविवारी संध्याकाळी ६ ते ९ या वेळात जागृतीचा कार्यक्रम घेतला जातो. आज अखेर साधारण ५००० लोकांनी जागृती घेतली.

औध्यागिक क्षेत्रात माहे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत झालेल्या जागृतीच्या कार्यक्रमापैकी काही पुढील प्रमाणे :

४) कमिन्स इंडिया पुणे या कंपनीत कर्मचारी व आधिकाऱ्यांसाठी जागृतीचा कार्यक्रम झाला.साधारण ३५० जणांनी जागृती घेतली.

५) किर्लोसकर डिझेल अॅण्ड सर्व्हीसेस, पुणे या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमास १५० जणांनी जागृती घेतली.

६) हिंदूस्थान एन्टिबॅायटिक्स या कंपनीत आक्टोबरच्या दुसऱ्या आढवड्यात कार्यक्रम झाला. त्यावेळी साधारण १०० जणांनी जागृती घेतली.

७) क्विन्स मेरी टेकनीकल इन्स्टिटयूट फॉर डिसेबल सोल्जर्स खडकी या संस्थेतील अपंग जवानांसाठी ऑगस्ट २००२ च्या पहिल्या आठवड्यात दिवसभर कार्यक्रम ठेवला होता. त्याला २५० जवानांनी जागृती घेतली. दोन दिवस फॅलोअप झाला. सध्या त्याठिकाणी सेंटर चालू आहे.

८) संकष्टी चतुर्थी निमित्त दि. २६ ऑगस्ट रोजी गणेश मंदिर शाहू नगर पब्लिक प्रोग्राम आयोजीत केला होता साधारण २०० लोकांनी जागृती घेतली.

९) तळेगांव दाभाडे सुयोग मंगल कार्यालय येथे दि. ८ ऑगस्ट २००२ रोजी पब्लिक प्रोग्राम आयोजीत केला होता. सुरवातीला श्री अरुण आपटे यांनी वातावरण निर्माण केले साधारण ३५० जणांनी जागृती घेतली.

१०) भोसरी गावातील धावडे वस्ती येथिल बाबा आनंद मंगल कार्यालयात दिनांक ४.८.०२ रोजी प्रदर्शन व जागृतीचा कार्यक्रम आयोजीत केला होता दिवसभरात साधारण १५० जणांनी जागृती घेतली.



## पुणे परिसरातील आजूबाजूच्या ग्रामिण भागात झालेले पब्लिक प्रोग्रामची संक्षिप्त यादी

| क्र. | ठिकाण | दिनांक | उपस्थिती | क्र. | ठिकाण | दिनांक | उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ओसाडे | ३१.४.०२ | १०० | २५. | जयदेव नगर | २७.७.०२ | १२०० |
| २. | निगड | ७.४.०२ | १०० | २६. | बारामती | २८.७.०२ | १७०० |
| ३. | निगड | १३.५.०२ | २०० | २७. | भगवण | ४.८.०२ | ९० |
| ४. | खानापूर | २.५.०२ | १५० | २८. | जंकशन | ४.८.०२ | ३० |
| ५. | वारजे नाका | ९.५.०२ | ६० | २९. | वालचंद नगर | ४.८.०२ | २५ |
| ६. | अवसरी | १२.५.०२ | ९० | ३०. | गोखळी | ४.८.०२ | १५० |
| ७. | आपटे कॉलनी | १३.५.०२ | ५० | ३१. | शिवणे | ८.८.०२ | ६० |
| ८. | गोऱ्हे खुर्द | १५.५.०२ | ६७ | ३२. | वडगांव निंबाळकर | ११.८.०२ | ४० |
| ९. | पिंपळेगांव वाघा | २२.२.०२ | ३० | ३३. | कदम वस्ती | ११.८.०२ | ६० |
| १०. | कोपरगांव | ४.५.०२ | १५० | ३४. | सस्ते मळा | ११.८.०२ | ७५ |
| ११. | रुळे | ९.५.०२ | ५० | ३५. | होळ | ११.८.०२ | ७० |
| १२. | शिरुर | ४.६.०२ | ७०० | ३६. | चोपडाज | ११.८.०२ | १०० |
| १३. | शिरुर | ८.६.०२ | १५० | ३७. | कर्वे नगर | १२.८.०२ | २०० |
| १४. | धायरी | ९.६.०२ | २०० | ३८. | शिवणे | १९.८.०२ | ६८ |
| १५. | कर्जत | १६.६.०२ | २०० | ३९. | बारामती | २१.८.०२ | १५० |
| १६. | बेबड ओव्हळ | ७.७.०२ | २०० | ४०. | सोमेश्वरनगर | २१.८.०२ | ६० |
| १७. | सरस्वती विद्या मं. | २४.६.०२ | ७० | ४१. | वडगांव निंबाळकर | २१.८.०२ | १२५ |
| १८. | फलटण | १२.७.०२ | ६० | ४२. | मुरुटी | २१.८.०२ | ६९ |
| १९. | रमणबाग | १४.७.०२ | ५०० | ४३. | चिरकांदे वस्ती | २१.८.०२ | ८५ |
| २०. | सुपे | १५.७.०२ | १५० | ४४. | १० फाटा | २५.८.०२ | १७५ |
| २१. | जकात नाका | १९.७.०२ | ६० | ४५. | बजरंग वाडी | २५.८.०२ | १३५ |
| २२. | विठ्ठलवाडी | २०.७.०२ | २५०० | ४६. | लाटे | २५.८.०२ | ८० |
| २३. | जयदेव नगर | २४.७.०२ | ८०० | ४७. | माळवाडी | २५.८.०२ | ६० |
| २४. | सरस्वती विद्या मंदीर | २४.७.०२ | ५४० | ४८. | चिरखांदे वाडी | २५.८.०२ | ७० |





| क्र. | ठिकाण | दिनांक | उपस्थिती | क्र. | ठिकाण | दिनांक | उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४९. | म.न.पा.शाळा क्र ६ | २४.८.०२ | १३० | ७५. | फरंदे वस्ती | २९.९.०२ | २०० |
| ५०. | वानवडी | १८.६.०२ | २५ | ७६. | वाघळ वाडी | २९.९.०२ | १७० |
| ५१. | कुरणे वाडी | १.९.०२ | १५० | ७७. | वाणे वाडी | २९.९.०२ | १५० |
| ५२. | माळवाडी | १.९.०२ | ६० | ७८. | भोंडवे वाडी | ६.१०.०२ | ३०० |
| ५३. | नलावडे वस्ती | १.९.०२ | ६० | ७९. | सासवड | ६.१०.०२ | १०० |
| ५४. | थोपटे वस्ती | १.९.०२ | ६० | ८०. | चांदगुडे वाडी | ६.१०.०२ | ५० |
| ५५. | कांबळेश्वर | १.९.०२ | ३५० | ८१. | चांदगुडे वाडी | ६.१०.०२ | १०० |
| ५६. | लाटे | १.९.०२ | १३९ | ८२. | खंडू खैरे वाडी | ६.१०.०२ | ५० |
| ५७. | अरण्येश्वर | २.९.०२ | १२० | ८३. | तळेगांव चर्च | २३.१०.०२ | ५० |
| ५८. | कदम वस्ती | ८.९.०२ | ७० | ८४. | शिवणे | ११.११.०२ | ७० |
| ५९. | सोमेश्वर साखर का. | ८.९.०२ | १५० | ८५. | आंबळे | १९.११.०२ | १२२ |
| ६०. | सोमेश्वर स्कूल | ८.९.०२ | ३०० | ८६. | टेकवडी | १९.११.०२ | ८० |
| ६१. | कांबळेश्वर | ८.९.०२ | १५० | ८७. | चोपडाज | १७.११.०२ | ८० |
| ६२. | वडगाव निंबाळकर | ८.९.०२ | १२५ | ८८. | स्वयंभुवाची वाडी | १७.११.०२ | २५० |
| ६३. | सहकार नगर | १२.९.०२ | ८० | ८९. | लोणी भापकर | १७.११.०२ | ३५० |
| ६४. | दहा फाटा | १६.९.०२ | १२०० | ९०. | मुढाळे | १७.११.०२ | १०० |
| ६५. | वाणे वाडी | १६.९.०२ | १३५० | ९१. | वाकी | १७.११.०२ | १५० |
| ६६. | सोरटे वाडी | १६.९.०२ | २०० | ९२. | वाघळ वाडी | २४.११.०२ | १५० |
| ६७. | कर्वेनगर | १७.९.०२ | ४० | ९३. | सोरटे वाडी | २४.११.०२ | ६० |
| ६८. | मुरूम | २२.९.०२ | २०० | ९४. | चौधर वाडी | २४.११.०२ | १२५ |
| ६९. | बुणगे वस्ती | २२.९.०२ | ५० | ९५. | भापकर मळा | २४.११.०२ | ६० |
| ७०. | विकास नगर | २२.९.०२ | १०० | ९६. | मुरटी | २४.११.०२ | ७० |
| ७१. | चव्हाणवाडी | २२.९.०२ | २२५ | ९७. | जोग वाडी | २४.११.०२ | ७० |
| ७२. | लोणी काळभोर | २३.९.०२ | १२५ | ९८. | कोंढवे घावडे | २७.११.०२ | २५० |
| ७३. | लोणी काळभोर | २४.९.०२ | ४० | ९९. | भुकुम | २८.११.०२ | २१० |
| ७४. | रावडी | २९.९.०२ | ५० | १००. | पब्लिक स्कूल | २९.११.०२ | २००० |



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०१. | निंबुत | २९.११.०२ | २५० | १०५. | फरांदे नगर | ८.१२.०२ | |
| १०२. | बाबुराव काकडे | २९.११.०२ | २५० | १२५ | | | |
| | विद्यालय निंबुत | | | १०६. | निरा | ८.१२.०२ | ४० |
| १०३. | प्रा. शाळा निंबुत | २९.११.०२ | २५० | १०७. | हनुमान वाडी | ८.१२.०२ | ४५ |
| १०४. | शेंडकर वाडी | २९.११.०२ | १७० | १०८. | लिमटेक | ८.१२.०२ | २५० |

एकुण जागृती घेतलेल्या लोकांची संख्या सुमारे २८,२००.

आपल्या भागातील नामवंत संस्थांमधे पब्लिक प्रोग्राम झाल्यावर त्यांचे अभिप्राय मिळाल्यास, माहिती पुणे कार्यालयाकडे पाठवावी, ती प्रसिद्ध करण्यात येईल. पुढील काळात याचा उपयोग इतर संस्थांमधे पब्लिक प्रोग्राम घेण्यासाठी होईल.

UDYOJAK
(MONTHLY)
A Publication of MCED

MCED

MAHARASHTRA CENTRE FOR ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT

NODAL AGENCY OF GOVERNMENT OF MAHARASHTRA,
(A JOINT VENTURE OF SICOM, MSFC, MSSIDC, MIDC, MELTRON & MITCON

AGRICULTURE COLLEGE CAMPUS, SHIVAJINAGAR, PUNE 411005 PH5537724/5528359

REF : MCED/RO-P/RO-ENLETY/333 Date August 05, 2002

To,
Mr. R.K. Pugalia.
Center Leader.
Sahajayoga Kendra
Vishwa Nirmal Dharma Society.
Paud Road, Kothrud,
Pune - 411 029

Sub : Letter of Thanks.

Dear Pugaliaji,

This has reference to the 'Self realization program' which was arranged by Mr. Anil Wajage and conducted by Mr. Vinod Bhatnagar at MCED office in Pune.

It was attended by 45 to 50 MCED computer franchisee owners and MCED staff members. It was really a wonderful experience for all of them. The address of Pune main center has been given to them. They are interested to attend center at you place.

We are thankful to you for providing us this great opportunity.

With Regards,

Thanking you,

Yours faithfully,

Yogiraj Deokar,
Regional Officer
MCED, Pune.






# गणपती पूळे हवन, १९, २० ऑक्टोबर २००२



